
# साईलीला

## श्रीरामनवमी विशेषांक

१९६९ | किं. ७५ पैसे



# या विशेषांकांत—


१ राम कथामृत गोड ( संपादकीय )

२ रामनाम आणि गांधीजी—ले. व्यंकटेश वकील

३ रामनवमीच्या निमित्तानें—ले. नाना अभ्यंकर

४ भरताचें अलौकिक बंधुप्रेम—ले. के. कृ. प्रधान

५ श्रीरामचंद्राचें उज्वल चारित्र्य—ले. गो. ज. सोमवंशी

६ मी वाचलेलें रामायण—ले. द. शं. टिपणीस

७ रामजन्मोत्सव व साईबाबा—ले. डॉ. के. भ. गव्हाणकर

८ साक्षात्कार—ले. के. कृ. प्रधान

९ साईबाबा आणि त्यांचा समाधिकाळ—

ले. डॉ. के. भ. गव्हाणकर

१० उर्मिलेचें बलिदान



# श्री साई वाक्सुधा

मनांतील सारे तर्ककुतर्क काढून टाका. त्या कुतर्कांमुळेंच पदोपदीं तुमची अडवणूक होत असते. तेव्हां प्रथम त्यांच्या बंधनांतून मोकळे व्हा. माणसाला कोणत्या ना कोणत्या अभिमानानें ग्रासून टाकलें आहे. त्या अभिमानामुळें त्याची प्रगती खुंटत असते; तरी त्या अभिमानाला पायांखालीं तुडवून त्याचा चेंदामेंदा करून टाका. त्याशिवाय तुम्हांला प्रगतीचा पल्ला गांठतां येणार नाहीं.

—श्रीसाईचरित्र


श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४८ वें ] एप्रिल १९६९ [ अंक १ ला

: संपादक :

**श्री. द. दि. पाटणकर**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

**टे. नं ४४३३६१**

: कार्यालय :

**साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.**

# राम कथामृत गोड

प्रियवाचक—

प्रतिवर्षाप्रमाणें याहिवर्षी श्रीरामनवमी विशेषांक आपल्या वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला सहाजिकच आनंद होत आहे. आणि तो कां होऊं नये ? रामनाम म्हणजे आनंदाचा महासागर. सर्वांना शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखविणारें व सर्व प्रकारच्या दुःखांवर नि संकटांवर विजय पताका फडकविणारें एक अमोघ शस्त्र. याच्या सहाय्यानें आणि निदिध्यासानें लक्षावधि लोकांना शाश्वत सुखाचा लाभ झालेला आहे.

वाल्मिक महामुनीनीं भारताला 'रामायण' या महाकाव्याचा लाभ करून दिल्यास हजारो वर्षांचा काळ मागें पडला असला तरी त्या रामनामानें भारतवासीयांना जो दिव्यानंदाचा लाभ करून दिला, तसा दुसऱ्या कोणत्या महाभागानें दिला असेल असें वाटत नाहीं. रामप्रभूच्या काळास हजारों वर्षें लोटलीं असलीं तरी जनमानसावरील त्या नावाचा पगडा आजही कायम आहे. व पुढेंही तो तसाच कायम राहील.

या नावाचें हें शाश्वत आकर्षण पुण्यप्रद व इष्टफळदायक आहे हें जाणून साईबाबानीं आपल्या हयातींत रामजन्मोत्सव साजरा करण्याची परंपरा सुरू केली व शिरडी संस्थानतर्फे ती अखंड व उत्तरोत्तर वाढत्या उत्साहाने चालू आहे. शिरडींत प्रतिवर्षी श्रीराम जन्माचा सोहळा सतत तीन दिवस चालू असतो. महाराष्ट्रांतील व महाराष्ट्राबाहेरील असंख्य भक्त त्या दिवसांत रामजन्माचा सुखसोहळा आनंदाने अनुभवीत असतात.

या रामनवमी महोत्सवानिमित्त साईलीला मासिकाचा एक विशेषांक प्रसिद्ध करण्यांत येत असतो. तसाच तो या वेळींही प्रसिद्ध करण्यांत येत आहेः रामनामाचें गुणगान हजारो वर्षांपासून या भरतखंडांत चालू असलें तरी तें

प्रेमानें घेतांना व तें नामसंकीर्तन ऐकतांना मनाला जो आनंद होत असतो तो अवर्णनीय आहे. त्यांत नाविन्य व मनाला हालवून सोडण्याचें अमोघ सामर्थ्य आहे.

भारतांतील सर्व भाषांतून वाल्मिकी रामायणाचीं भाषांतरें झालीं, आजवर असंख्य प्रतिभाशाली लोकांनीं रामायण व श्रीराम प्रभूचें गुणगान केलें तरी तें पुरेसें वाटत नाहीं; रामनामाचें महात्म्यच असें अपूर्व आहे.

या साईलीला, रामनवमी विशेषांकासाठीं आम्हीं विनंती केल्यावरून श्री. व्यंकटेश वकील, श्री. केशव कृष्ण प्रधान, श्री. नाना अभ्यंकर, श्री. गो. ज. सोमवंशी, डॉ. के. भ. गवाणकर, श्री. द. शं. टिपणीस व इतर लेखक मित्रांनी लेख पाठवून या पवित्र कार्यांत आम्हांला जो सहकार दिला त्याबद्दल त्यांचे आम्हीं आभारी आहोंत. त्यांच्या लेखांमुळे या अंकाच्या उपयुक्ततेंत अनन्यसाधारण भर पडली आहे. त्यांच्याकडून यापुढील काळांतही असाच सहकार मिळत जाईल अशी आशा आहे.

# रामनाम आणि गांधीजी

लेखक : व्यंकटेश वकील

**श्री. व्यंकटेश वकील हे एक सिद्धहस्त लेखक असून लघुकथा, कादंबरी, नाट्य, काव्य वगैरे सर्व क्षेत्रांत त्यानीं यशस्वी संचार केलेला आहे. श्रीतुळसीदास रामायण ( श्रीरामचरितमानस ) या अत्यंत लोकप्रिय हिंदी ग्रंथाचा मराठींत सुंदर व सुबोध अनुवाद त्यानीं केला असून तोही लोकप्रिय झाला आहे.**

**— संपादक**

श्रीसमर्थ रामदास स्वामींच्यानंतर महात्मा गांधीजी समान अन्य कोणी निष्ठावंत रामभक्त झालेला नाहीं. रामनामावर त्यांची अढळ श्रद्धा होती. रामनाम त्यांना वज्राप्रमाणें सामर्थ्यवान वाटत होतें, नव्हे रामनाम वज्राचा देखील भेद करूं शकेल, अशी त्या वैष्णवाची श्रद्धा होती.

## रामनामानें भुतें पळतात !

रामनामावर बालपणापासूनच त्यांची श्रद्धा बसलेली होती. बालपणीं गांधीजी भूताखेतांना भीत असत. परंतु तें त्यांचे भय त्यांची दाई रंभा हिनें घालवलें. ती म्हणाली, "भुतंखेतं ही मनाची कल्पना आहे. पण तुला जर त्यांची भीति वाटत असेल, तर रामनाम घेत जा. रामनाम ऐकतांच भुतं पळून जातात."

गांधीजी तेव्हांपासून रामनामावर श्रद्धा ठेवायला शिकले आणि पुढें तर 'रामनाम' त्यांच्या निर्भय भक्तिमय जीवनाचा अमोघ महामंत्र बनला. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता आल्डस हक्सले म्हणतो त्याप्रमाणें नामश्रद्धेचा हा अज्ञेय मेघ संकटग्रस्ताच्या तप्त कष्टी जीवनावर कोसळून त्याला सांत्वन देतो. देवावर

भार टाकून आत्मसमर्पण करणारा भयमुक्त होतो. परंतु त्यासाठीं देवावर असीम श्रद्धा असली पाहिजे. भयवर्जन केलें पाहिजे म्हणजे प्रत्यक्ष देव आपल्या अंतःकरणांत प्रगट होतो, बापानें जसे पुत्राचे अश्रु पुसावेत, तसें सांत्वन आपल्या मनाला मिळतें. गांधीजी म्हणत, "आपल्या मनाचें संतुलन खवळलेल्या संकटाच्या दर्यात सांभाळण्यासाठीं रामनामासारखी निरीम कोणती नाहीं. गलबताचें बूड वादळांत स्थिर राखण्यासाठीं तें जड पोलादी करतात, त्याला 'निरीम' म्हणतात. रामनामांत तसें सामर्थ्य असतें, अशी त्यांची श्रद्धा त्यांनीं यंगइंडिया २१–१०–१९२६ मधील आपल्या लेखांत नमूद केली आहे. परंतु त्यांच्या मतें रामनाम म्हणजे कांहीं जंतर–मंतर नव्हे, किंवा गंडादोरा अगर ताईत नव्हे, कीं त्याच्यावर विसंबून स्वस्थ निष्क्रिय बसून राहातां येईल. कांहीं प्राचीन संतांनीं निवृत्तिवादाची शिकवण दिलेली आहे. देवावर भार टाकून स्वस्थ बसण्याचा उपदेश केलेला आहे. परंतु गांधीजींना तें मान्य नव्हतें. ते आपल्या त्याच लेखांत म्हणतात, "मला नम्रपणानें एक गोष्ट सांगावीशी वाटते. स्वस्थ निष्क्रिय बसून चालणार नाहीं. प्रयत्न–कृति आवश्यक आहे. निष्काम कर्म केलेंच पाहिजे. रामनामाचा नुसता जप करून किंवा त्याचें पुरश्चरण करून कार्य भाग होणार नाहीं, परंतु कार्यभाग सुकर होण्यासाठी, आत्मशुद्धीसाठी, सन्मार्गाच्या दिशेनें आपले प्रयत्न एकवटण्यासाठीं रामनामाची गरज आहे."

## रामनामाचा मंत्र कुविचार पळवितो

ही त्यांची श्रद्धा तशीच अखंडित राहिली. पुढें ती अधिक शाश्वत झाली. पुढें १९४७ मध्यें त्यांनी म्हटलें आहे, "रामनामाचा मंत्र कुविचाराला पळवून लावतो, आणि कुविचार पळाला कीं मग दुराचार घडणें शक्यच नसतें. परंतु अशा रीतीनें रामनामाचा आडोसा घेऊन बलवान झालेल्यानें मनस्वी होऊन चालणार नाहीं, त्याच्या आत्मिक पावित्र्याची कसोटी अखंडित पणें जन्मभर त्यानें द्यावयाची असते."

परंतु हें प्रभावी रामनाम असतें तरी कसें ? रामनामाचा हा प्रभाव भक्तराज तुलसीदासजी यांनी आपल्या रामायणांत सांगितलेला आहे. त्यांच्या काव्यांत प्रथम याज्ञवल्क्य या रामभक्ताची कथा सांगितलेली आहे. तो

रामाविषयीं अनेक शंका विचारत असतो, आणि कथेचा शेवट शिव पार्वती संवादानें केलेला आहे. पार्वती शंकराला शंका विचारते.

साधुसंत अन् तुम्हीं सदाशिव,
जन्ममरण-बंधन मुक्तिस्तव
रामनाम जप अखंड करितां !
कोण राम हा मंगल दाता ?
काय अयोध्या पति जो राम
सीता विरहें श्रमित सकाम
संतापानें वधितो रावण,
तो स्मरतां कां रघुकुल भूषण ?"

## शंकेचें निराकरण

शंकरानें मग तिच्या शंकेचें निराकरण केलें. ते म्हणतात :—

"न तो सती, सीतापति राम,
जो ब्रह्मादिक मन–विश्राम,
नच तो राघव दशरथ-नंदन,
अजर अमर तें सत्य सनातन
निराकार व्यापक कालातीत
भक्त हृदय मंदिरी सदाश्रीत,
विश्व व्यापुनि उरे समंत्र,
निर्मळ, नित्य, पवित्र, रामव्रत !"

शंकराच्या त्रिनेत्रांत रामाचें जें अरूप साठवलें होतें, तेंच गांधीजींच्या मनीं मानसीं रामरूप पावलें होतें. ते म्हणतात, "रामाचीं नांवें असंख्य आहेत, अगदीं अगणित सुखांच्या इतकीं ! राम गुणातीत आहे, अवर्णनीय आहे ! केवळ नांवानें त्याची कल्पना करतां येत नाही. राम आणि कृष्ण हे देवाचे अवतार आहेत, असें आपण म्हणतो, परंतु आम्हीं मानवांनीं त्यांना अवतार मानलें. कारण त्यांच्या ठायीं आम्हांला दैवी गुणांचे आम्हीं कल्पिलेले अंश आढळले. परंतु गांधीजींच्या मतें "रामापेक्षां अधिक श्रेष्ठ रामनाम आहे."

म्हणूनच गांधीजींना खरा सत्याग्रही हा रामभक्त वाटत होता. मग तो आपल्या रामाला कोणतेंहि नांव देवो. "ईश्वर अल्ला तेरे नाम, सबको सन्मति

दे भगवान ", ही त्यांची भजनामधली धुन सर्वश्रुत आहे. रामधुन हें एक प्रबल हत्यार आहे. तें निर्बळाला सामर्थ्य देतें. याचा प्रयोग त्यांनीं नौखालींत करून पाहिला आणि त्याचा प्रभाव एकाद्या दैवी चमत्काराप्रमाणें दिसून आला.

## नौखालींतील अनुभव

नौखालींत सर्वत्र हिंसा बोकाळली होती, द्वेष थैमान घालीत होता. व्यथितपणानें गांधीजी म्हणतात, "माझ्या भवतालीं काळोखाशिवाय कांहींहि दिसत नाहीं. कोणत्याहि मार्गानें गेलें तरी त्याच्यावर असत्याचा वणवा पसरलेला आहे. सद्भाव आणि शांति कुठेंच आढळत नाहीं. यांतूनच मला मार्ग काढला पाहिजे. मला कितपत यश येणार आहे, हें त्या रामालाच माहीत असणार ! या अशा दिव्य परिस्थितींतून मी जगत आहें ही त्याचीच कृपा." त्यांची नात मनु हिला ते म्हणाले, " रात्रीं १०-११ वाजतां मी झोपतों, पहांटे २ वाजतां उठून माझी शांतियात्रा सुरू करतों. या अशा वयांत जराहि थकवा न येतां हें मी करतों." केवळ रामनामाच्या बळावर आपण हें सारें घड्याळाप्रमाणें पार पाडीत आहों, अशी त्यांची श्रद्धा होती.

## स्मरूं आणि मरूं

त्या हिंसेच्या वातावरणांत गांधीजींनीं 'रामधुन' चा नवा मार्ग भयभीत बंगाल्यांना शिकवला. " स्मरूं आणि मरूं !" रामनामाचें नवें सामर्थ्य जनतेला पटवून दिलें. उदाहरणादाखल पुढील घटना गांधीजींचे चिटणीस प्यारेलालजी यांच्याच शब्दांत संक्षेपानें देत आहें; त्या वेळीं गांधीजी नौखाली सोडून बिहारमध्यें पेटलेली जातीय दंगल शमविण्यासाठीं गेले होते. प्यारेलालवर ते आपलें शांतिकार्य सोंपवून गेले होते.

" निर्वासितांच्या पुनर्वसनाच्या कार्यक्रमापैकीं एक भाग म्हणून आंतर्जातीय भोजन समारंभ सरकारी (पाकिस्तान) अधिकाऱ्यांच्या हजेरींत आयोजित करण्यांत आला होता. भोजनसमारंभ चालू असतांना मुस्लीम-लीगच्या घोषणा देत मुसलमानांचा एक जमाव तेथून गेला. त्यांतल्या एका गुंडानें एका भंग्याच्या घरात शिरून तेथें दडून बसलेल्या त्याच्या लहान मुलाला चोप दिला........मी त्या जमावाच्या मागोमाग कांहीं अंतर चालून गेलों. त्यांतले दोनचार ओळखीचे निघाले म्हणून त्यांना हटकलें, परंतु त्यांनी

कानावर हात ठेवले····परत भोजन सुरू होतें तेथें आलों. ‘ घोषणा ऐकून आणि जमाव बघून जे कुणी घाबरले नसतील त्यांनीं हात वर करावे ’, असें सुचविलें.—त्या जमावामधील पांच पुरुष आणि तीन स्त्रिया यांनीं हात वर केले. फार वाईट वाटलें मला. रात्रभर चिंतन केलें, प्रार्थना केली आणि मग मार्ग सुचला. मी त्या निर्वासितांना सामुदायिक रामधुन म्हणायला शिकविलें. प्रथम मी माझ्या वाडीपासून प्रारंभ केला. मग दुसऱ्या वाडींत जाऊन तो मंत्र शिकवला. त्यांना रामनामाची दैवी शक्ति आणि त्याचा गर्भित अर्थ शिकवला. ”

अतांपर्यंत ते आतंकित झालेले होते. त्यांची देवळें पाडून टाकलेलीं होतीं,—

म्लेंच्छ अनाचारी मातले,
गांवांवरी घातिले घाले,
कितेक यातिभ्रष्ट केले,
मूर्ती पायीं तुडविल्या !
मुलेंबाळें आक्रंदिती
वोढिल्या पळविल्या सती गरती
विषें खाउनी कुंवारी मरती
नाहीं गणति दुखावल्या !
पुरुष मात्र बहुधा मेले,
षंढ प्राणभयें पळाले,
ऐसें आभाळ कोसळे,
अवघाचि कल्लोळ मातला !
ऐशा गांजिल्याचें परित्राण
रामभक्त आला धांवून
भित्या शिकविली रामधून
यज्ञवन्हीच चेतला !”
प्राणांची कुर्वंडी केली,
मरणाची भीति सांडिली,
लंडीसवें झुंज मांडिली
विजयी श्रीराम जाहला !

## रामधुनचा विराट उद्घोष

अशा रीतीनें आधिभौतिकावर आध्यात्मिकानें विजय मिळवला. नौखालीत उघडपणें देवाचें नांव घेण्याची हिंमत नव्हती. त्या भोजनाच्या प्रसंगी तर एक स्त्री मुसलमानांच्या घोषणेनें एवढी घाबरली होती कीं, तिनें पळ काढून एका शेजारच्या वाडींत दडी मारली होती. दोन मुली तिच्या शोधावर गेल्या. तिला त्यांनीं शोधून आणलें. तिला रामधून म्हणायला शिकवलें. चार दोन दिवसांतच रामधूनचें लोण सर्व वाडींच्या मधून पसरलें, अवघी दुमदुमली नौखाली. सामुदायिक भजन कीर्तन होऊं लागलीं. रामधूनचा विराट उद्घोष गगनव्यापी झाला.

ती पळून जाणारी स्त्री आतां निर्भय झाली होती. रात्रीं साडेदहा वाजतां एकटी कंदील न घेतां ती परत जाण्याइतकी धीट झाली होती. अशाच इतर स्त्रिया व मुली निर्भय बनल्या. एक ठाकूरमा नांवाची म्हातारी स्त्री तर मुसलमान वस्तींत देखील जाऊन येई. तिला मुसलमान देखील वचकून असत.

दुसऱ्या दोन मुलींचा मामा कासिम नांवाच्या मुसलमानाच्या हातून मारला गेला असें त्यांनीं ऐकलें होतें. प्यारेलालजीच्या समक्ष त्या मुली त्याला भेटायला गेल्या. त्यांनी त्याला कधींच बघितलें नव्हतें. तरी पण त्याला सांगणार होत्या कीं "असेल हिंमत तर दाब आमचा देखील गळा! तुला आम्ही भीत नाहीं".

## निर्बलके बल राम

असें निर्भयपणाचें वातावरण रामधुन नौखालींत निर्माण करूं शकलें. "निर्बलके बल राम!" ही श्रद्धा त्यांनी तेथें निर्माण केली. त्यांनीं जें नौखालींत घडवून आणलें तेंच त्यांनी पुढें भारतांत कशावरून नसतें केलें?

रामनामावर त्यांची जी श्रद्धा होती, तिचा उपयोग शरीरव्याधि–मोचनासाठीं त्यांनी करून पाहिला होता. आगाखान महालांतून बाहेर पडल्यानंतर कांहीं दिवस ते उरळी कांचन येथें स्वतःवर निसर्गोपचार करीत होते. सुटकेच्या आधीं त्यांची प्रकृति अत्यंत खालावली होती. रक्तदाब वाढला होता. आगाखान महालांत दोन मृत्यू झाले होते, महादेवभाई आणि कस्तुरबा. आतां सरकारला

तिसरी समाधि तेथें बांधायची नव्हती. त्यांच्या सुटकेचा कुहुम त्याच्या कानांवर घालण्यांत आला. "उद्यां आठ वाजतां तुमची सुटका करण्यांत येणार आहे महात्माजी।"

त्या रात्रीं मनाची उत्तेजना शमविण्यासाठीं गांधीजींनीं रामनामाचा जप केला, असें त्यांनीं स्वतःच पुढें सांगितलें. "मला रात्रभर झोंप आली नाहीं. झोपायची इच्छा तर खूप होती. परंतु झोंप येतच नव्हती. मग नामस्मरण सुरू केलं, रामनामाचा जप सहस्रवेळा करावा, लक्षवेळा करावा, कोटिनाम जप केल्यानं मनाला शांति मिळते." ते पुढें म्हणतात-"आतां मला प्रसन्न वाटतं. परंतु आजच्यासारखा मी कधींच भान हरवून बसलों नव्हतों. काय करावं नि बोलावं हेंच सुचत नाहीं. परंतु जो राम आतांपर्यंत वाट दाखवीत आला, तोच आतां यापुढंहि मार्ग दाखवील!"

## रामनामावर अढळ श्रद्धा

रामदास जसे "तो राम आम्हांला देतो रे," असें आत्मविश्वासानें सांगत, तोच विश्वास--तीच श्रद्धा गांधीजींच्या मनांत होती. त्यांची सुटका झाल्यावर त्यांना तुरुंगांत जडलेल्या व्याधींच्यावर, मलेरिया, जंताचा विकार आणि रक्तक्षय यांच्यावर औषध घेण्याचें त्यानीं साफ नाकारलें. औषधोपचार म्हणजे आपला नैतिक पराभव आणि रामनामावरील आपली अश्रद्धा कबूल करणें होय, असें त्यांना वाटत होतें. त्यांच्या डॉक्टरमित्रांनीं त्यांच्याबरोबर युक्तिवाद करून पाहिला परंतु त्यानीं म्हटलें, "या बाबतींत मी तडजोड करायला तयार नाहीं, मला खुशाल हेकेखोर म्हणा, पण मी माझी रामनामावरील श्रद्धा गमवायला तयार नाहीं." डॉ. गज्जर, डॉ. बिधनचंद्र रॉय, डॉ. गिल्डर, डॉ. जीवराज मेहता यांच्यासारख्यांनीं त्यांच्या पुढें हात टेकले. परंतु रामनाम त्यांच्यापेक्षां गांधीजी अधिक श्रेष्ठ मानीत होते. ते आपल्या एका मित्राला म्हणाले, "काल रात्रीपर्यंत माझी श्रद्धा तितकीशी बळकट नव्हती, परंतु रात्रीं माझी हरवलेली श्रद्धा गवसली. तो राम सर्वश्रेष्ठ धन्वंतरी आहे. त्याच्या स्पर्शानं-त्याच्या स्मरणानं मी बरा होईन." त्यांचा निसर्गोपचारावर विश्वास होता. जगांतलीं पंचतत्त्वें आणि रामनाम यांची सांगड घालून मनुष्य जर निसर्गोपचार करील, तर त्याला १२५ वर्षें जगतां येईल, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती.

## रामनाम व निसर्गोपचार

पुढें १९४६ चे मार्च महिन्यांत ते उरळी कांचन येथे स्वतःवर निसर्गोपचार करीत असतांना त्यांनीं खेडूतांवर देखील रामनामाच्या औषधीचा उपचार करण्याचा विचार बोलून दाखविला. तेथें एक उपचार केंद्रकाढलें.

पहिल्याच दिवशीं ३६ रोगी दवा घेण्यासाठीं आले. त्यांच्यांतील पांच सात जणांना सूर्यस्नान, शरीरमर्दनादि उपाय सुचवून प्रत्येकाला रामनामाचा जप करण्याचा उपचार त्यांनीं सांगितला.

त्यांच्या या उपक्रमावर टीका होऊं लागली. त्यांचे व्याही राजगोपालाचार्य हे त्यांचे पहिले टीकाकार. त्यांनीं पत्र पाठवून म्हटलें, "फार जोरांत सुरू आहे तुमचा धंदा, असे राजकुमारी लिहिते. उद्या महात्म्याचा पुण्यस्पर्श करून घेण्याचें वेड मात्र न फैलावो म्हणजे मिळवली. हरकत नाहीं. रद्दड दवा देण्यापेक्षां हें कांहीं वाईट नाही." ( मार्च ३१–१९४६ ).

गांधीजी कुचाळकी करणाराला आपला उपकारकर्ता मानीत असत. भक्तदादूच्या कवित्वाच्या ओळी ते म्हणून दाखवत,

**"निंदक माझा बंधु सखा,**
**वेतनाविना करी चाकरी,**
**स्वतःसोसुनी हानि बिचारा**
**परहित कर्ता, होवो शतायु!"**

ही कुचाळकी सहन केली नाहीं तर मग रामनाम जपणें व्यर्थ होय असें त्यांना वाटत होतें. म्हणूनच लागलीच सात एप्रिलच्या हरिजन मध्यें त्यांनीं रामनामाच्या उपचार मीमांसेचें सार सांगून टाकलें. "आपल्या शारीरिक आणि मानसिक दुःखांचें मूळ एकच आहे, म्हणूनच त्याच्यावर एकच उपाय असणें साहजिक आहे.---म्हणून मी रामनामाचा साधा उपचार सुचविला आहे. रामनाम हीच सात लाख खेड्यांमधील जनतेची खरीखुरी दवा आहे. परंतु रामनाम म्हणजे नुसती ओठांची कसरत नव्हे, तें तुमच्या मनांत रुजलें पाहिजे, देहांत भिनलें पाहिजे."

## १२५ वर्षें जगण्याची आकांक्षा

उपनिषदांत यमराजाला परत लावून १२५ वर्षें जगणाऱ्या याज्ञिकाची कथा आहे. गांधीजी तसे १२५ वर्षें जगूं पाहात होते. रामनामानें स्वतःची

जीवनयात्रा १२५ वर्षें करीत राहाण्याचा त्यांचा संकल्प होता. त्यांची सुटका झाल्यावर पंडित मालवीयजींनीं त्यांना अभिनंदनपर संदेश पाठविला, "लक्षावधि लोकांच्या प्रार्थनेकडे परमेश्वरानें लक्ष दिलें आणि तुमची सुटका झाली, याबद्दल त्याचे अगणित आभार ! भारतमातेची आणि मानवतेची सेवा करण्यासाठीं तो परमेश्वर तुम्हांला शतायुषी करील."

गांधीजींनी आभार मानतांना उत्तर पाठवलें, "एका झटक्यांत तुम्ही माझीं २५ वर्षें हिरावून घेतलीं. हरकत नाहीं, तीं तुम्हांला घ्या."

१९४२ मध्यें अटकेपूर्वीं त्यांनीं अशीच १२५ वर्षें जगण्याची इच्छा प्रगट केली होती. त्यांनीं यमाला एकदां तसें परत पाठवलें देखील.

३० जानेवारी १९४७ ! रामनामावरल्या त्यांच्या श्रद्धेची कसोटी घेणारा एक प्राणांतिक प्रसंग. नौखालीमधील शांतियात्रेमधील आमकी नांवाचें एक खेडें !

## कसोटी घेणारा एक प्रसंग

त्या खेड्यांत शेळीचें दूध मिळू शकलें नाहीं. पण गांधीजींनीं त्याचें फारसें मनावर घेतलें नाहीं आणि सांगितलें, "शेळीच्या दुधाऐवजीं कोवळ्या शहाळ्याचें पाणी देखील चालू शकेल, आणि शेळीच्या लोण्याची जागा खोबरेलानें भरून काढतां येईल" त्याप्रमाणें त्यांनीं दुधाऐवजीं शहाळ्यांतलें आठ औंस पाणी घेतलें. आणि मग त्यांना ढाळ होऊं लागले. संध्याकाळपर्यंत त्यांना खूप थकल्यासारखें झालें. मनूला त्यांच्या माथ्यावर आलेला घाम दिसला. कमोडवरून ते बिछान्याकडे परत येतांना त्यांना दरदरून घाम सुटला, सारख्या जांभया येऊं लागल्या. त्यांना घेरी येईलसें दिसलें. ते आपल्या खोलींत जाऊं शकतील, असें तिला वाटत होतें, परंतु ते गलितगात्र झाले होते. अगदीं कोसळूं पाहात होते. तिनें त्यांना सांवरलें, त्यांच्या कपाळावरचा घाम टिपला. हळूंच त्यांचा माथा सांवरून धरला आणि प्रो. निर्मल बोस यांना मदतीसाठीं हांक मारली. गांधीजीना झोपवल्यानंतर तिला वाटलें,—'परिस्थिति गंभीर आहे. आपल्यावर उगीच दोष येणें बरें नव्हे'—म्हणून तिनें डॉ० सुशिला नायर यांना एक चिठ्ठी लिहिली आणि ती प्रोफेसरांचे

हस्तें सुशिला नायर यांचेकडे पाठविणार तोंच गांधीजींनीं डोळे उघडले. तिला त्यांनीं म्हटलें, " तूं निर्मल बाबूंना बोलावलंस, हें कांहीं मला आवडलं नाहीं. तूं अजून पोर आहेस, म्हणून मी तुला क्षमा करतों. अशा प्रसंगीं तूं फक्त रामनाम घ्यावं, अशी माझी अपेक्षा होती. अंतःकरणपूर्वक भक्तिभावानं राम-नाम घेणं हाच एक उपाय अशा वेळीं उपयोगी पडतो.....आतां ही गोष्ट कुणालाच सांगूं नकोस. सुशिलाला देखील कळवूं नकोस. राम हाच माझा एकमेव धन्वंतरी आहे. जोंपर्यंत त्याला माझ्यापासून सेवा करवून घ्यायची आहे, तोंपर्यंत तोच मला जगवील, माझं रक्षण करील. नाहींतर तोच मला दूर सारील." (एकलो जानेरे-पृ. १२७)

मनु दचकून मागें सरली. तिनें चिठ्ठी चुरगळून टाकण्याचा प्रयत्न केला. पण तिची ओशाळगत गांधींजींच्या लक्षांत आली. त्यांनी म्हटलें, " म्हणजे तूं तशी चिठ्ठी लिहिली होतीस तर !"

मनूनें अपराधाची कबुली दिली.

गांधीजी म्हणाले, " आज त्या रामानं तुझं माझं दोघांचेंहि रक्षण केलं. सुशिलानं आपल्या खेड्यातलं काम तसंच सोडून इथं धांव घेतली असती." ती आली असती तर मी तुझ्यावर रागावलों असतों, स्वतःवरहि संतापलों असतों. आज माझी कसोटी घेण्यांत आली. माझ्या अंतःकरणावर जर खरोखरच रामनामाचं वर्चस्व असेल आणि त्याला कायमचं स्थान मिळालं असेल तर मी रोगराईनं कधींहि मरणं शक्य नाहीं, आणि माझी ही श्रद्धा माझ्याच नव्हे तर इतरांच्या बाबतींत देखील लागू पडेल."

या प्रसंगीं त्यांनीं रामभक्त हनुमानाचा उल्लेख करून म्हटलें " हनुमानाच्याप्रमाणें आम्हांला बलवान होतां येणार नाहीं, परंतु मनाचं सामर्थ्य तरी संपादन करतां येईल. आपण तें रामकृपेनं करूं शकूं !"

बरोबर एक वर्षानें ३० जानेवारी १९४८ या दिवशीं गांधीजीची वाणी खरी ठरली. आधीं प्राणांतिक उपवास करून देखील त्यांनीं मृत्यूवर जय मिळविला. यमराज परतून गेला परंतु त्या दिवशीं प्रार्थनास्थळीं यमानें संधि साधली.

गांधीजींनीं प्राणांताच्या वेळीं शेवटचे शब्द उच्चारले, " हे राम !"

# रामनवमीच्या निमित्तानें--

लेखक : **नाना अभ्यंकर**

प्रस्तुत लेखाचे लेखक श्री. नाना अभ्यंकर यांच्या नाट्याभिनयकौशल्याची जशी सर्वांना माहिती आहे, त्याप्रमाणें त्यांच्या भरगच्च वाङ्मयसेवेची फार थोड्यांना माहिती असेल. नाट्यक्षेत्रांतील त्यांचे पराक्रम जसे उज्ज्वल आहेत तशीच त्यांची वाङ्मयसेवाही आहे. त्यांनीं केलेलें वाल्मीकि रामायणाचें सुबोध भाषांतर लोकप्रिय होऊन राहिलें आहे. 'राष्ट्रपिता महात्मा गांधी' हा वंदनीय चरित्रग्रंथ त्यांनीं आपले मामा व मार्गदर्शक वीर वामनराव जोशी यांच्या प्रेरणेनें लिहिला व त्याचें महत्त्व लक्षांत घेऊन नॅशनल बुक ट्रस्टनें तो प्रकाशांत आणिला. त्याची हिंदी आवृत्तीही ट्रस्टनें काढिली आहे व गुजराती भाषांतरे प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. त्याशिवाय खरा वारकरी, लग्नाचा फांस, अपराध कुणाचा? वगैरे कादंबऱ्या, सवाई सूड व अंधारांतील ज्योत (अनुवादित) हीं नाटकें आणि कोलंबस व श्री. बंडोपंत जोशी यांचीं चरित्रें त्यांनीं लिहून तीं प्रसिद्धीस आलीं आहेत.

—संपादक

'भरतभेट' म्हणून प्रसिद्ध असलेल्या प्रसंगीं, भरत हा राज्यकर्ता या नात्यानें रामानें त्याला पुढील प्रश्न विचारले. या प्रश्नांवरून त्या काळांत राज्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या व्यक्तीला कोणकोणत्या गोष्टींची खबरदारी घ्यावी लागत असे यावर उत्कृष्ट प्रकाश पडतो. रामानें भरतास विचारलें:

## राजाचीं कर्तव्यें

"पुरोहित वसिष्ठ मुनींचा मान तूं योग्य प्रकारें राखतोस ना? मसलत हें राजांच्या विजयाचें मूळ आहे. तेव्हां श्रेष्ठ मंत्री आणि नीतिशास्त्रज्ञ अमात्य यांच्याशीं तुझी मसलत अगदीं गुप्तपणें चालत असते ना? तूं निद्रेचा गुलाम बनलेला नाहींस ना? तुझा सेनापति धीट, शूर, धैर्यवान, बुद्धिमान, आचरणानें पवित्र, कुलीन, राजनिष्ठ आणि चतुर असा आहे ना? सैन्याचा पगार आणि

भत्ता तूं वेळच्या वेळीं देत असतोस ना? शत्रुपक्षाकडील सगळ्या आणि आपल्याकडील मंत्री, पुरोहित व युवराज या तिघांशिवाय इतर प्रत्येक हुद्देदाराच्या मागें परस्परांना माहीत नसलेले असे तीन तीन हेर ठेवून तूं त्यांची माहिती मिळवीत असतोस ना? राज्याला अपाय करणारे लोक एकदां घालवून दिल्यानंतर पुन्हा परत आल्यावर ते दुबळे बनले आहेत अशी स्वतःची समजूत करून घेऊन तूं त्यांची उपेक्षा करीत नाहींस ना? कृषिकर्म, पशुपालन वगैरेंवर उपजीविका करणारे लोक तुला प्रिय आहेत ना? स्त्रियांवर अंध विश्वास ठेवून त्यांना गुप्त गोष्टी सांगत नाहींस ना? तुझे सर्व किल्ले धनधान्य, हत्यारें, उदक, यंत्रें, कारागीर आणि धनुर्धर यांनीं भरलेले असतात ना? तुझें उत्पन्न अधिक असून खर्च कमी आहे ना? तुझा खजिना अयोग्य ठिकाणीं खर्च होत नाहीं ना? एखाद्या श्रीमंतावर अगर गरिबावर कांहीं खटले उपस्थित झाले असतांना तुझे बहुश्रुत अमात्य निर्लोभी राहून खटल्यांचा निकाल न्यायाला धरून लावीत असतात ना? भरता, निष्कारण दोषारोप केलेल्या प्रजाजनांच्या डोळ्यांतून जे अश्रू पडतात ते राज्योपभोगजन्य सुखाकडेच दृष्टि ठेवून राज्य करणाऱ्या राजाचा नाश करतात. अर्थानें धर्माला, धर्मानें अर्थाला किंवा त्या दोघांनाहि विषयलोभरूप कामानें कधीं बाध आणीत नाहींस ना? नास्तिकपणा, असत्य भाषण, क्रोध, हयगय, चेंगटपणा, ज्ञानी माणसांची भेट न घेणें, आळस, इंद्रियाधीनत्व, एकट्यानेंच राजकारणाचा विचार करणें, विपरीत विचारसरणी असलेल्या लोकांची सल्ला घेणें, कर्तव्य म्हणून ठरलेल्या गोष्टी करण्यास आरंभहि न करणें, गुप्त मसलत बाहेर फुटण्याची काळजी न घेणें, उठल्याबरोबर प्रातःकाळीं मंगलप्रद कृत्यांचें अनुष्ठान न करणें आणि चोहोंकडीस शत्रूंवर एकदम हल्ला करणें, या चौदा दोषांपासून राजानें नेहमीं अलिप्त असलें पाहिजे. तसा तूं आहेस ना? तयार केलेलें मिष्टान्न आपल्या मित्रांना न देतां तूं एकट्यानेंच भक्षण करीत नाहींस ना?"

## वाल्मीकींची काव्यप्रतिभा

कांहीं कांहीं ठिकाणीं व प्रसंगीं वाल्मीकि ऋषींच्या काव्यप्रतिभेला बहर येतो. उदाहरणार्थ,

रामानें वालीला देहान्तशासन घडवून किष्किंधेचें राज्य सुग्रीवाला दिलें व त्याच्या साहाय्यानें लंकेवर स्वारी करून सीतेची मुक्तता करण्याचें ठरविलें

परंतु त्यावेळीं पावसाळ्याचा प्रारंभ होत असल्यामुळें पावसाळा संपेपर्यंत स्वारीचा बेत लांबणीवर टाकणें भाग होतें. तो पावसाळा एखाद्या विस्तीर्ण गुहेंत काढण्याचा संकल्प करून, तशी एक गुहा पसंत करून राम लक्ष्मणाला म्हणाला—

'ही पर्वताची गुहा रमणीय, विशाल व हवेशीर आहे. पावसाळा संपेपर्यंत आपण इथेंच वास्तव्य करूं. सूर्याच्या किरणांच्या योगानें समुद्राचें पाणी शोषून घेऊन नऊ महिनेपर्यंत धारण केलेला व दिव्य औषधीप्रमाणें लोकांच्या जीवनास कारण होणारा जलरूपी गर्भ आकाशरूप स्त्री टाकून देत आहे. नील मेघाचा आश्रय करून स्फुरण पावणारी ही विद्युल्लता रावणाच्या अंकावर तडफड करणाऱ्या बिचाऱ्या सीतेप्रमाणें मला भासत आहे. लहान लहान इंद्रगोप संज्ञक कीटकांनीं मधूनमधून चित्रविचित्र झालेल्या गवतानें युक्त झालेली भूमि लाक्षा-बिंदुयुक्त अशी पोपटी रंगाची शालजोडी अंगावर लपेटून बसलेल्या स्त्रीसारखी दिसत आहे. मदमत्त झालेल्या नदीरूप कामातुर स्त्रिया आपले चक्रवाकरूप स्तन उन्नत करून आणि भर्त्याकडे जाण्यास आडकाठी करणाऱ्या तटरूप वृद्ध स्त्रियांना दूर लोटून विषयाचा उपभोग परिपूर्ण घेतां यावा एतदर्थ पुष्पादि नवीन शेले पांघरून मोठ्या उत्सुकतेनें आपल्या समुद्ररूप भर्त्याकडे जात आहेत. लोक राजांना अभिषेक करूं लागले असतां ज्याप्रमाणें ते राजे आपलें निर्मल रूप व सौंदर्य प्रकट करीत असतात त्याप्रमाणें देवराजानें दिलेल्या व वायूनें जवळ आणिलेल्या अशा मेघोदकपरिपूर्ण कलशांच्या योगानें अभिषिक्त होत असलेले महापर्वत जणुं कांहीं आपलें निर्मळ सौंदर्य प्रकट करीत आहेत.'

## श्रीरामाचा सुग्रीवास सडेतोड निरोप

पावसाळा संपून आकाश अगदीं स्वच्छ दिसूं लागलें. पण सुग्रीवाची कांहींच हालचाल दिसेना. तेव्हां राम लक्ष्मणाला म्हणाला,

'पावसाळा संपल्याबरोबर निसर्गांत किती बदल झाला आहे पहा! सुशोभित चंद्रकिरणांचा समुदाय हाच प्रिय पतीचा हात व त्याचा स्पर्श झाल्यामुळें जिला हर्ष झालेला आहे आणि म्हणूनच नक्षत्ररूप नेत्र तारका जी किंचित् प्रकट करूं लागली आहे अशी ही रक्तवर्णरूप अनुरागानें युक्त असलेली संध्यारूप कामुक स्त्री आपोआपच आकाशरूप वस्त्राचा त्याग करीत

आहे. प्रिय पतींनीं उपभोग घेतल्यामुळें आळसत आळसत चालणाऱ्या कामिनी स्त्रियांचा वेग प्रभातकाळीं मंद झालेला असतो त्याप्रमाणें या नद्यांचे वेग मंद झाले आहेत. पतीशीं नव्यानेंच समागम होऊं लागलेल्या लज्जायुक्त स्त्रिया हळूहळू लाज कमी होत जाऊन पतीला आपला कटिप्रदेश संकोच न बाळगतां दाखवूं लागतात त्याप्रमाणें या नद्या हळूहळू आपलीं वाळवंटें दाखवूं लागल्या आहेत. राजे लोकांनीं स्वारीवर निघण्याचा हा समय असून सुग्रीवाची कांहींच हालचाल दिसत नाहीं. लक्ष्मणा, आतांच्या आतां किष्किंधेला जा आणि विषयसुखांत रममाण झालेल्या त्या मूर्खाला असें सांग कीं, पूर्वीं ज्यानें आपल्यावर उपकार केला आहे त्याची इच्छा परिपूर्ण करण्याचें वचन देऊन तें जो मोडतो तो पुरुष या जगांत अधम ठरत असतो. आपला मनोरथ सिद्धीला गेल्यावर मित्राच्या कार्यासाठीं जो झटत नाहीं तो कृतघ्न मृत झाल्यावर त्याला श्वापदेंहि खात नाहींत. तुझ्या कार्यासाठीं मी एकट्या वालीचाच वध केला पण आतां तुझा तुझ्या सर्व बांधवांसह वध करीन.'

## न्यायदान

राम राज्यकारभार पाहूं लागल्यावर अगदीं गरिबांतल्या गरिबालाहि न्याय मिळावा अशाविषयीं तो अतिशय दक्षता घेत असे. बरेच दिवस कोणीहि प्रजाजन रामाकडे तक्रार घेऊन आला नाहीं तेव्हां रामानें त्याबद्दल लक्ष्मणा-जवळ विचारणा केली व राजवाड्याबाहेर जाऊन कोणाची कांहीं फिर्याद आहे कीं काय यासंबंधीं कसून चौकशी करण्यास सांगितलें. लक्ष्मण राजवाड्याबाहेर येऊन पाहतो तों त्याला राजवाड्याबाहेरील पायऱ्यांजवळ एक कुत्रा बसलेला आढळला. त्याची कांहीं तरी तक्रार आहे हें जाणून लक्ष्मणानें त्याला रामाकडे येण्यास सांगितलें. तेव्हां तो कुत्रा म्हणाला, 'माझा जन्म अधम योनींत झालेला आहे. देवालय, नृपालय व द्विजालय यांमध्यें अग्नि, इंद्र, सूर्य व वायु यांचें वास्तव्य असल्यामुळें अशा ठिकाणीं माझ्यासारख्याचें वास्तव्य असणें योग्य नाहीं. पण राम हा मूर्तिमंत धर्म आहे. त्याची परवानगी मिळाली तरच मी राजवाड्यांत येईन.'

लक्ष्मणानें हें रामाला जाऊन सांगितल्यावर त्या कुत्र्याला आंत आणण्याची रामानें त्याला परवानगी दिली. कुत्रा समोर आल्यावर राम त्याला

म्हणाला, 'सारमेया, तुला अभय आहे. तुला जें कांहीं सांगायचें असेल तें खुशाल सांग.' त्यावर कुत्रा म्हणाला, 'माझ्यावर अन्याय झाला असल्याची खात्री पटल्यावर तूं तो दूर करशील याविषयीं मला आश्वासन देत असशील तर मी माझी तक्रार तुझ्यापुढें मांडतों.' रामानें त्याप्रमाणें आश्वासन दिल्यावर तो कुत्रा म्हणाला, 'एका ब्राह्मणाचा मी कोणताहि अपराध केलेला नसतांना त्यानें मला विनाकारण प्रहार केला. याबद्दल त्याला शासन घडलें पाहिजे.'

रामानें त्या ब्राह्मणाला बोलावून घेतलें. त्याला कुत्र्याच्या तक्रारीसंबंधीं विचारल्यावर तो ब्राह्मण म्हणाला, 'मी भिक्षेसाठीं बाहेर पडलों असतांना हा कुत्रा माझ्या मार्गांत आडवा पडलेला मला दिसला. मी त्याला दोनतीनदां हड् हड् केलें पण हा तसाच माझी वाट अडवून राहिला. मला अतिशय भूक लागलेली असल्यामुळें मला अतिशय राग आला व त्या भरांत मी त्याच्यावर प्रहार केला. तेव्हां रामानें कुत्र्याला म्हटलें, 'या ब्राह्मणानें आपला अपराध कबूल केला आहे. त्याबद्दल याला कोणतें शासन करावें तें तूंच सांग.' तेव्हां कुत्रा म्हणाला, 'रामा, याच्या अपराधाबद्दल तूं याला धर्मसंबंधीं समाजाचें आधिपत्य दे. कालंजर पर्वतावर तूं याला कुलपतीचा अधिकार दे.'

त्याप्रमाणें रामानें केल्यावर तो ब्राह्मण कुलपति या नात्यानें हत्तीवर बसून निघून गेला. कुत्र्यानें शिक्षेऐवजीं ब्राह्मणाचा गौरवच केला या कल्पनेनें न्यायालयांतील सर्व सभासदांना आश्चर्य वाटत होतें. कुत्र्याच्या हें लक्षांत आलेंच. तेव्हां त्या सर्व लोकांना उद्देशून तो म्हणाला, 'कोणत्याहि परिस्थितींत कोणीहि कुलपतीचा अधिकार स्वीकारूं नये. पुत्र, पशू व बांधव यांसह ज्या माणसाला नरकांत पाडण्याची इच्छा असेल त्याला देव, गाई व ब्राह्मण यांच्यावर अधिकारी नेमावें.'

हें ऐकूण ते सभासद त्या कुत्र्याकडे 'आ' वासून पाहूं लागले व तो कुत्रा हसत हसत निघून गेला.

# भरताचें अलौकिक बंधुप्रेम

लेखक : केशव कृष्ण प्रधान

श्री. केशव कृष्ण प्रधान, बी. ए. एल्एल्. बी. यांचा साईलीलेच्या वाचकांस नव्यानें परिचय तो काय करून द्यावयाचा ? साईलीलेवर त्यांची गेल्या किती तरी वर्षांपासून निर्व्याज व अखंड प्रीति आहे. अध्यात्मक्षेत्रांत अविरत व चिकाटीच्या प्रयत्नांनीं प्रगतीचा मार्ग चोखाळणारे ते एक चिरप्रवासी व साधक आहेत. आपणास वेळोवेळीं आलेले अनुभव साधक बंधूंपुढें ठेवण्यांत त्यांचा हातखंडा आहे, 'सद्गुरूच्या शोधार्थ' हें गेल्या वर्षीं प्रसिद्ध झालेलें त्यांचें पुस्तक या गोष्टीची सत्यता पटविणारें आहे, असें आम्हांला वाटतें.

— संपादक

भरत जवळि नाहीं मातुलग्रामवासी
भरत जननि धाडी राघवा काननासी ।
दशरथ मृत झाला राम जातां वियोगें
तृण बहुत दिसांचें अग्निच्या जेविं योगें ॥ १ ॥

बालपणीं शाळेंत वाचलेला हा श्लोक. त्या वयांत त्याचा माझ्या बालमनावर किती खोल परिणाम झाला म्हणून सांगूं ? हा श्लोक वाचल्या-बरोबर दिंडी वृत्तांतली दुसरी एक कविता मला आठवली. ती म्हणजे सूर्यवंशांतील उत्तानपाद राजाच्या चरित्रांतली. ध्रुवबाळाला त्याच्या सापत्न मातेनें राजाच्या मांडीवरून खालीं ढकललें त्या प्रसंगावरची. ती कविता अशी—

**धरूनीया सापत्न भाव चित्तीं । पदें लोटुनियां पाडियेला क्षिती**
**रडत गेला माउली जेथ होती । न खंडेच तै नेत्र अश्रु पाती ।**
**म्हणे माता तान्हया काय झालें । कोण पापीये तूज गांजियेलें**
**मला रायें मांडिये बैसवीलें । राजभाजेनें पदें लोटियेलें ॥**

## दोन सावत्र मातांच्या कथा

या दोन्ही सावत्र मातांच्या कथा. ध्रुवबाळासारखेच राजसिंहासनावरून सावत्र आईनें ढकलून दिलेले प्रभु रामचंद्र अरण्यांत जातांना मला दिसले व बाळ ध्रुव परमेश्वराकडे अढळपद मागण्यास अरण्यांत गेला. रामप्रभु आपलें स्वतःचें अढळपद स्वयंभू परमात्मस्वरूप, अरण्यांतील वृक्ष, वेली, दगड, डोंगर, दऱ्या, पर्वत यांच्या हृदयांत कायम कोरून त्यांना अढळपद देण्यासाठीं गेले. विश्वाला पुनीत करणारीं प्रभूचीं पदकमलें मातीचा कण न् कण मंगल करीत अयोध्येहून थेट लंकेपर्यंत लागलीं. धन्य आहे त्या भूमीची. मी त्या वयांत उगाचच त्या दोन्ही सावत्र मातांवर रागानें जळफळलों. माझ्या तेव्हां हेंही लक्षांत आलें नाहीं. प्रभु रामचन्द्राच्या कैकयीनें केलेल्या या छळामुळेंच एका प्रेमळ सज्जन बंधु प्रेमानें अक्षरशः जीवनभर तळमळणाऱ्या दैदीप्यमान आदर्श सावत्र भावाचें भरतालाच काय पण अखिल जगताला दर्शन घडलें. ती आदरणीय अलौकिक विभूति म्हणजेच कैकेयी. पुत्र–भरत ध्रुवबाळानें व प्रभुरामचन्द्रांनीं मानवी हृदयें जिंकून अढळपद मिळविलें तर या अलौकिक कैकेयीपुत्रानें जन्मभर निष्कंटक मिळालेलें अढळ सिंहासन पद झुगारून देऊन, मानवी अन्तःकरणें ज्यास्तच प्रभावीपणानें जिंकलीं.

## भरताची भीति खरी ठरली

कैकेयीच्या "तावडतोब निघून ये" या निरोपासरसा मातुलग्रामाहून निघालेला भरत अयोध्या नगरीच्या वेशींत शिरतांच सर्व अयोध्या नगरी त्यास मृतवत् व अगदीं ओस वाटली. त्याच्या रामचन्द्रावरील निरतिशय प्रेमामुळें प्रथमच जें त्याला वाटलें, तेंच दुर्दैवानें खरें झालें. त्याला वाटलें, "माझ्या रामचन्द्राला तर कोणी अयोध्येच्या बाहेर घालविला नाहीं ना? मला वाटतें, या अयोध्येत आतां रामच उरला नसावा." त्याची भीति खरी ठरली.

प्रत्यक्ष आपल्या मातेनें रामचन्द्रास वनांत धाडिलें हें ऐकून पितृनिधनाच्या दुःखाचासुद्धां भरतास विसर पडला व संतापानें लाल होऊन क्षणभर काय करावें हेंही त्याला सुचेना. आपल्या मातृदैवताचा धिःकार करीत व “अवो पापिणी काय केलें तुवां हें” अशा कडक शब्दांत तिची निर्भर्त्सना करीत ‘राम हेराम’ असा अखंड जप करीतच, भरतानें अरण्याचा रस्ता धरिला. त्याच्या मागोमाग कित्येक अमात्य, सचिव व इतर प्रजाजन व सैन्यही निघालें. मातुलग्रामाहून आपण मोठ्या पहाटेस निघालों आहोंत, आपल्या पोटांत अन्नाचा कण सुद्धां गेला नाहीं, या सर्वांचा विसर पडून, पाण्याच्या एका थेंबालाही अयोध्येंत न शिवतां, अनवाणी, रामभेटीशिवाय आपण जगणें शक्य नाहीं हें जाणून अरण्यांतून, काट्याकुट्यांतून, प्रखर सूर्यतापांतून रात्रीबेरात्रीं तब्बल तीन दिवस शेकडों मैल प्रवास करून भरत चित्रकूट पर्वताच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचला. सर्व लोकांस तेथेंच थांबण्यास सांगून, दूर एके ठिकाणीं धूर निघत होता तिथें रामचंद्राचा आश्रम असेल, असें समजून त्या दिशेकडे एकटाच चालूं लागला.

## लक्ष्मणाचा अनावार क्रोध

प्रभु रामचन्द्र, सीतामाई व लक्ष्मण एका उंच ठिकाणीं चढून हें सैन्य कोणाचें हें पाहात होते. एकट्याच भरताला पुढें येतांना पाहून प्रभु रामचन्द्रावर झालेल्या अन्यायानें खवळलेला लक्ष्मण त्यास ठार मारण्यास धावला. तेव्हां हें सर्व जाणून अतिशय चपळाईनें प्रभूंनीं लक्ष्मणाला आपल्या कवेंत पकडून ठेवला व ते आपल्या प्रेमळ वाणीनें लक्ष्मणास म्हणाले “लक्ष्मणा, थांव. माझ्या लाडक्या भरताला येऊं दे माझ्याजवळ. मी माझ्या भरताला चांगला ओळखतों. तुला त्याची मुळींच कल्पना नाहीं.”

आणि इतक्यांत “राम–राम–माझा प्यारा राम” करीतच भरतानें रामचन्द्राच्या पायांशीं लोळण घेतलें. ‘हे पाय आतां मी सोडणार नाहीं. जीव गेला तरी सोडणार नाहीं. नाहीं, रामा, मला तूं परत जायला सांगूं नकोस. मला तें अयोध्येचें राज्य नको. रामा, तुझ्याशिवाय मी अयोध्येंत जगूंच शकणार नाहीं रे. परत चल–परत चल,’ असें प्रेमानें बोलून तो प्रभूचे चरण धरून स्फुंदून स्फुंदून रडूं लागला.

हें दृश्य पाहून सीतामाईचे डोळे आसवांनीं भरून आले व लक्ष्मणानें मोठ्या प्रेमानें त्याला उचलून "भरता भरता, अरे असें काय करतोस"? म्हणत उठविलें व नंतर प्रभु रामचन्द्राच्या प्रेमानें पसरलेल्या बाहुपाशांत शिरून, रामचंद्राच्या वक्षःस्थळावर आपलें डोकें ठेवून भरत एकदांचा विसावला.

## भारतीय संस्कृतीचें उज्ज्वल प्रतीक

रामायणांतला हा बंधुप्रेमाचा प्रसंग आमच्या भारताच्या संस्कृतीचा एक उज्ज्वल प्रतीक आहे. दुर्दैवानें या बुद्धियुगांत आम्ही भारतीय पैशाच्या मापानें प्रीति-प्रेम मोजूं लागलों आहोंत. शहरांतल्या महागाईनें व राहण्याच्या जागेच्य आकुंचितपणामुळें आम्हां भारतीयांचीं मनें पण आकुंचित होऊं लागलीं आहेता. यांत्रिक जगांत आमचीं हृदयें पण निव्वळ यंत्रासारखीच चालूं लागलीं आहेत. यंत्राला मार्दवतेसाठीं तेलपाणी तरी द्यावें लागतें. आमच्या हृदयांत मात्र भावनारसच आटून गेला आहे. सख्ख्या भावावरचें प्रेम आटलें आहे तेथें सावत्र भावाबद्दल भाव दुर्मिळ झाल्यास नवल तें काय? अलीकडे रामप्रेमाची-भरत-भावनांची, निव्वळ विटंबना मात्र चालली आहे. वाईट वाटतें, दुसरें काय!

प्रभु रामचन्द्रांनीं भरताला, नंतर मानवी नियतीबद्दल जो बोध केला तसा अमृततुल्य उपदेश, जगाच्या नीतिशास्त्रांत सुवर्णाअक्षरांनींच लिहावा लागेल. महाकवि श्रीयुत माडगूळकर यांच्याच काव्यांत सांगायचें तर गीत रामायणांतील पुढीच ओळीच तो सांगू शकतील.
प्रभु भरतास सांगतात—

दैवजात दुःखें भरता। दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगतीं। पुत्र मानवाचा
माय कैकयी ना दोषी। नाहिं दोषि तात
राज्यत्याग, कानन यात्रा। सर्व कर्मजात
अद्भुत ना कांहीं झालें। नाहीं अकस्मात
खेळ चालला हा माझ्या पूर्वसंचिताचा
पराधीन आहे जगतीं। पुत्र मानवांचा

## ह्या पूर्वसंचिताचा खेळ

रामप्रभु म्हणाले "भरता-वेड्या-हा सर्व खेळ माझ्याच पूर्वसंचिताचा चालला आहे. त्यांत वाईट मानण्यासारखें काय आहे? मला राज्य सोडावें लागलें. ही काननयात्रा चालली आहे. नाहीं रे—यांत कोणाचाच दोष नाहीं. तुझी माता कैकेयी हिचाही नाहीं किंवा आपले वडील दशरथ यांचाही नाहीं. ह्या दोष माझ्याच दैवाचा—म्हणजे माझा आहे. माझें पूर्वसंचित म्हणजे माझें पूर्वजन्मींचें कर्म—खराब आहे व म्हणूनच माझें दैव त्यांत दुःखानें भरून वाहात आहे. तुझ्या नशिबानें तुला राज्यपद प्राप्त झालें आहे. ह्याकडे माझ्यासाठीं उगाच पाठ फिरवूं नकोस. दैवाधीन मानवाला-अरे, नको असले तरीही सुखोपभोग भोगावेच लागतात. तूं तरी त्याला काय करणार'?

परंतु भरत ऐकेना. तो म्हणाला, "दादा, तुमच्याशिवाय हे सुखोपभोग मला विषासारखे वाटतात त्याला मी तरी काय करूं? तुम्ही परत चला व तुमचें राज्य तुम्ही परत घ्या. ज्या राज्याला तुम्ही भूषवणार, ज्या सिंहासनावर रघुकुलभूषण बसणार—त्या राज्यावर राज्य करण्याची, त्या रघूच्या दिव्य सिंहासनावर बसण्याची-माझी लायकी नाहीं. नका दादा, असं करूं नका. ऐका माझें."

## वचनपालनाची महती

नंतर रामचंद्रांनीं भरताला वचनपालनाची महती सांगितली. ते म्हणाले, "वेड्या, मी चौदा वर्षें अरण्यवास पत्करीन व भरताला राज्यावर बसण्यास अडथळा आणणार नाहीं, असें वचन मी आपल्या आईला, कैकेयीमातेला व आपल्या पूज्य पित्याला दिलें आहे. भरता, तूं मला तें वचन पाळण्यास मदत करणार नाहींस का? तुला माहीतच आहे कीं राम वचनभंग कदापि करीत नाहीं."

असा पेंच भरतास टाकल्यावर रामप्रेमानें विव्हळ झालेला भरत रामवियोगाचें दुःख सहन करण्यास तयार झाला. तो म्हणाला "दादा, आतां मी काय करूं तें तरी मला सांगा." तेव्हां मोठ्या प्रेमानें त्याच्या पाठीवर हात फिरवीत प्रभु रामचंद्र त्याला म्हणाले, "भरता—माझ्या सर्व भावंडांत माझा ज्यास्त लाडका भाऊ तूं आहेस. म्हणूनच मी तुला सांगतों, माघारी फीर. क्षत्रियाचा धर्म पाळून अयोध्येचें राज्य करून रघुवंशाच्या उज्ज्वल

इतिहासांत आपल्या आदर्श राज्यव्यवस्थेनें अधिक भर घाल. प्रजाजनांवर पुत्राप्रमाणें प्रेम कर. जा, तुझा वडील भाऊ या नात्यानें तुला माझा सदैव आशीर्वाद आहे."

## भरताची मागणी

त्यावर भरताची मूळ निर्लोभी वृत्ति व रामावरचें निष्काम प्रेम अधिकच उचंबळून आलें. तो प्रभूचे दोन्ही हात आपल्या हातानें प्रेमानें कुरवाळीत म्हणाला, "दादा, मी फक्त तुझ्याजवळ दोनच वर मागतों ते मला दे. नाहीं म्हणूं नकोस. एक वर म्हणजे तूं अयोध्येला परत येईपर्यंत तुझ्या नांवानें, सिंहासनावर–रघुकुलाच्या त्या पवित्र, महान मंगलमय गादीवर तुझ्याच पादुका ठेऊन मला राज्य सांभाळण्याची परवानगी दे आणि दुसऱ्या वरानें तूं अयोध्येला परत आल्यावर तुझें राज्य तुला परत देण्याची मला परवानगी दे आणि त्याचा स्वीकार कर. नुसता नागरिक म्हणून नव्हे–राजा म्हणून स्वीकार कर. कबूल ?"

प्रभु रामचन्द्रांना सुद्धां या मागण्यांचा इन्कार करतां येईना. भरताचें आपल्यावरील तें गंगौघासारखें निर्मल प्रेम पाहून प्रभूच्या डोळ्यांतून टपाटप अश्रू वाहूं लागले व भरताला प्रेमानें मिठी मारून त्यांनीं भरताच्या मस्तकाचें अवघ्राण केलें.

असें म्हणतात कीं, एरवी मानवी भाव धारण करणारे रामचन्द्र प्रभु, त्या वेळेला तो भाव पालटून परमात्म प्रभूच्या आपल्या सत्य स्वरूपांत मग्न झाले व त्यांच्या दिव्य वाणींतून शब्द बाहेर पडले. "**एकवार राम जानकीप्रेम विसरेल पण भरता, जोंवर आकाशांत सूर्य, चन्द्र, तारे चमकताहेत तोंवर भरताचें रामावरील प्रेम जग विसरणार नाहीं.**" लाडक्या–परत अयोध्येला जा. प्रजानन तुझी वाट पहात आहेत. राम तुझ्या मागणीचा इन्कार करूंच शकत नाहीं."

## भरताचा अयोध्येंतील कार्यक्रम

भरत परत अयोध्येला परतला तरी देखील रामवियोगाचें दुःख त्याला कमी करतां येईना. उलट अयोध्यानगरीचें पुनरपि दर्शन झाल्याबरोबर "जळावीण

मासा" आणि रामावीण अयोध्या ही कल्पना सुद्धां त्याला सहन होईना. रामाशिवाय अयोध्येंत राम नाहीं असें म्हणत, नंदिग्रामीं रामचंद्राच्या पादुका रघुकुळभूषण सिंहासनावर राज्याभिषेक करून बसवून, प्रभुरामचंद्राच्याच नांवानें तो राज्य करूं लागला. रामप्रभु परत आल्याशिवाय अयोध्येचें दर्शन सुद्धां घ्यावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें. मी तुमचा राजा नाहीं, प्रभु रामचंद्र तुमचे राजे आहेत असें प्रजाजनांना सतत बजावीत या दिव्यचरित भरताने नंदिग्रामीं एक झोपडी बांधून सर्व उपभोगाचा त्याग करून रामस्मृतीनें नंदिग्रामींच अरण्यांतील अथवा त्याहून खडतर अशीं दुःखें भोगून सतत चौदा वर्षें राम राम जप करीत आपलें आयुष्य कंठिलें.

## भरताचें अजरामर रामप्रेम

रामाचीं वनवासाचीं चौदा वर्षें पुरीं झालीं. पुष्पक विमानांतून प्रभुरामचंद्र जानकी व लक्ष्मण अयोध्येला परत निघण्यापूर्वीं प्रभु रामचंद्रांना आपला प्रियबंधु भरत याची प्रेमानें हृदय भरून येऊन आठवण झाली. सर्व जगतास भरत-राम प्रेमाची दिव्य कसोटी लावून भरताचें रामप्रेम अजरामर आहे याचें प्रात्यक्षिक करून तें पुन्हा एकदां तितक्याच उज्ज्वल स्वरूपांत दाखवावें असें वाटलें. म्हणून त्यांनीं हनुमंताला एका वृद्ध ब्राह्मणाचा वेष घेऊन नंदिग्रामीं जाऊन रामाच्या आगमनाची वर्दी देण्यास सांगितलें. ते म्हणाले "हनुमंता, तूं वृद्ध ब्राह्मणाच्या वेषांत नंदिग्रामीं जाऊन भरताची भेट घे व त्याला मी माझा चौदा वर्षांचा वनवास संपवून परत येत आहें हें वृत्त कळव. हें वृत्त ऐकतांना व ऐकल्यावर भरताच्या चेहऱ्यावर जे जे भाव निर्माण होतील, त्यांचें नीट निरीक्षण कर. कारण सतत चौदा वर्षांच्या राज्यसुखाच्या भोगानंतर भरताला कदाचित् राज्यत्याग करणें आवडणार नाहीं व तसें कांहीं तुझ्या दृष्टीस पडल्यास मला तावडतोब कळव".

## वृद्ध ब्राह्मणाच्या स्वरूपांत हनुमंत

रामचंद्राची ही आज्ञा हनुमंतानें तावडतोब शिरसावंद्य करून तो नंदिग्रामाकडे रवाना झाला. कोणी वृद्ध ब्राह्मण आपणांस कांहीं सांगूं इच्छितो आहे असें कळतांच भरतानें स्वतः जाऊन त्याची भेट घेतली. प्रभु रामचंद्राच्या आगम-

नाची शुभवार्ता ऐकतांच भरताचा आनन्द गगनांत मावेना. रामचरित्रांत कै. चिंतामण विनायक वैद्य म्हणतात—

"तें (वृत्त) ऐकतांच हर्षाच्या उन्मादानें भरताला एकदम मूर्च्छा आली व तो धाडकन खालीं पडला. कांहीं वेळानें सावध होऊन त्यानें हनुमानास कडकडून मिठी मारली व त्याला आपुल्या आनंदाच्या विपुल अश्रुधारांनीं भिजवून टाकिलें आणि म्हटलें :–"तूं देव अस, किंवा मनुष्य अस : तुला या प्रिय वार्तेबद्दल सहस्र गाई व शंभर गांवें इनाम देतों." नंतर भरतानें शत्रुघ्नाला शहरांत खबर देण्यासाठीं व सर्व नगर ताबतोब शृंगारण्याविषयीं आणि राजमातांना व वसिष्ठ गुरूंना घेऊन येण्याविषयीं आज्ञा केली. भरतानें हनुमानाला तूं कोण, कोठील वगैरे प्रश्न विचारून नंतर रामचंद्राची हकीकत विचारली. तेव्हां हनुमानानें, चित्रकूट पर्वत सोडून गेल्यापासून तों रावणाला मारून व बिभीषणाला लंकेचें राज्य देऊन सुग्रीव बिभीषणांसह भरद्वाजऋषीच्या आश्रमांत राम येईपर्यंतची हकीकत सांगितली व आतां लवकरच राम, लक्ष्मण व सीता पुष्पक विमानांतून येतील असें सांगितलें." ( श्रीरामचरित्र पान २३३ )

## तो अभूतपूर्व सोहळा

"आज रामप्रभु अयोध्यानगरींत प्रवेश करणार," "आज रामप्रभु अयोध्यानगरींत प्रवेश करणार," असें म्हणत आनंदानें हजारों अयोध्यावासी जन उत्तम पोषाख करून आपआपल्या ऐश्वर्यानुरूप वाहनावर बसून प्रभूचें दर्शन घेण्यास सज्ज झाले. स्त्रिया सर्व अलंकार अंगावर चढवून, प्रभूंना पंचारती ओवाळण्यासाठीं उत्सुक झाल्या. सर्व शहरच गुढ्या, तोरणें, पताका यांनीं शोभिवंत केलें होतें. रस्ते धुवून साफ करून त्यावरून चंदनाच्या पाण्याचा सडा घातला होता. त्या सर्वांचा सुवास आसमंतांत भरून गेला होता. अयोध्या नगरींतून प्रजाजनांच्या आनंदाचें लोण जणू कांहीं आजू-बाजूच्या झाडे झुडपें, वेली, फुलें यांना सुद्धां मिळालें असावें असें वाटत होतें. ती सर्वच कशीं आज प्रफुल्लित दिसत होतीं. इतक्यांत आकाशांतून अयोध्यानगरीवर फुलांचा वर्षाव झाला व सीतामाई, त्यामागून लक्ष्मण आणि शेवटीं रामप्रभु पुष्पक विमानांतून भरकन् येऊन अयोध्यानगरींत प्रवेश करिते झाले. सर्व बाजूंनीं आसमंतांत दिव्य सूर उमटले.

**प्रभु आले, आले, मंदिरीं**
**विजयपताका या रामाच्या फडकती अंबरीं**
**प्रभु आले, आले मंदिरीं ॥**

चौदा वर्षांच्या व्रतानें कृश झालेला, परंतु मुखावर अत्यंत आनंद झळकत असलेला, जटामंडल धारण करणारा प्रभूंचा लाडका व्रतस्थ भरत त्यांना पंचारती ओवाळण्यास सामोरा झाला. भरतानें पंचारती ओवाळल्यावर प्रभु रामचंद्रांनीं त्यास कडकडून मिठी मारली व ते म्हणाले "माझ्या लाडक्या भरता, माझ्या सतत विवंचनेनें किती कृश झाला आहेस तूं ?" इतकें बोलून प्रभूंच्या डोळ्यांतून भरतप्रेमानें अश्रुधारा वाहूं लागल्या.

नंतर एक क्षणसुद्धां भरत त्यास विसरला नाहीं. त्या चौदा वर्षें बाळगलेल्या रामप्रभूंच्या पादुका, राजछत्रें व चामरें प्रभूंच्या चरणाशीं ठेवून, कर्तव्यपालन, रामप्रेम व अलौकिक स्वार्थत्यागाचें मूर्तिमंत प्रतीक, भरतखंडाचें हे विशाल भरतहृदय "राम–हे राम–हे राम" असा प्रभुनामाचा जप अंतर्यामीं सतत करीत रामचरणावर विसावलें.

# श्रीरामचंद्राचें उज्ज्वल चारित्र्य

लेखक : गो. ज. सोमवंशी, एम्. ए; ( नासिक )

**श्रीरामचन्द्रचरणौ मनसा स्मरामि, श्रीरामचन्द्रचरणौ वचसा गृणामि ।
श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि, श्रीरामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥**

**श्री. गो. ज. सोमवंशी हे एक अभ्यासू वृत्तीचे नाणावलेले शिक्षक आहेत. आतां ते सेवानिवृत्त झाले आहेत. पौराणिक, धार्मिक व आध्यात्मिक ग्रंथांचें वाचन, मनन हा त्यांचा आवडता छंद आहे. नासिकसारख्या श्रीरामप्रभूंच्या पदस्पर्शांनीं पुण्यपावन झालेल्या क्षेत्रांत वास्तव्य करून आध्यात्मिक ग्रंथवाचनांत व मननांत ते आपलें जीवन आनंदानें कंठीत आहेत. —संपादक**

श्रीमद् भागवतांतील हा कथाभाग आहे. एकदां भरतवर्षांत विदेह-राजा निमि मोठमोठ्या ऋषींच्या साहाय्यानें एक महान् यज्ञ करीत होता. त्याच्या त्या यज्ञामध्यें, इतस्ततः स्वच्छन्द विहार करणारे—

**कविर्हरिरन्तरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ।
आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥**

कवि, हरि, अन्तरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन, हे नऊ ऋषभदेवाचे भाग्यवान संन्यासी पुत्र यदृच्छया येऊन पोंचले. हे नऊ योगी आत्मविद्येमध्यें महान् अधिकारी होते. ते भगवन्ताचे परमप्रेमी भक्त व सूर्यासारखे तेजस्वी दिगम्बर महात्मे आलेले पाहून, केवळ राजा व पुरोहितवर्गच नव्हे, तर प्रत्यक्ष अग्निकुंडांतील अग्निदेवांनीं सुद्धां त्यांना उत्थापन देऊन ( उभें राहून ) त्यांचें स्वागत केलें. निमिराजानें त्यांचें भगवत् प्रेम व अधिकार जाणून त्यांना उच्चासनावर बसवून त्यांचें विधिपूर्वक पूजन केलें. आपल्या तेजस्वी कांतीनें त्या यज्ञमंडपांत ते जणूं ब्रह्मदेवाचे चार मानसपुत्र, सनक, सनन्दन, सनत्सुजात, व सनत्कुमार यांचेप्रमाणें शोभूं लागले. राजा विनयानें नम्र होऊन त्यांना प्रश्न करता झाला, “ महाराज,

जीवमात्राच्या कल्याणाकरितां, इतस्ततः सदैव भ्रमण करणारे असे आपण, मला भगवान मधुसूदनाच्या पार्षदाप्रमाणें वाटतां आहांत. म्हणून आमच्यावर कृपा करा, व आम्हांला हें सांगा कीं जीवाच्या परम कल्याणाचें स्वरूप काय आहे ? त्याचें साधन कोणतें आहे ? महाराज, आपल्यासारख्या संतांच्या समागमाचें महत्त्व काय वर्णावें ? म्हणून आम्ही सर्व त्या उपदेशाला पात्र आहोंत, असें आपण मानीत असाल, तर कृपा करून आम्हांला भागवतधर्मांचा उपदेश करा".

अशी ही राजाची विनंति ऐकून, त्या सर्वांना परमानन्द झाला, व ते ऋत्विज व सभामंडपांतील सर्व सदस्यांचे मध्यें बसून, क्रमाक्रमानें त्यांना सांगूं लागले. पहिल्यानें कवि नांवाच्या मुनीनें, भगवन्ताच्या चरणाची जी नित्य निरंतर उपासना, तिचें महत्त्व वर्णन केलें. नंतर हरि नांवाच्या दुसऱ्या मुनीनें समस्त प्राणिमात्रांच्या हृदयांतःस्थित अशा आत्मस्वरूप भगवंताचें वर्णन करून 'भागवत' कुणाला म्हणावें याचें स्पष्टीकरण केलें. अशा रीतीनें, अन्तरिक्षानें मायेचें स्वरूप सांगितलें, तर ही माया कशी तरावी, याचें विवेचन प्रबुद्धानें केलें.

नंतर राजानें त्यांना 'नारायणा' च्या स्वरूपाचें वर्णन करा अशी विनंति केल्यावर, पिप्पलायनानें त्याचें समाधान केलें. राजाच्या विनंतीवरून आविर्होत्रानें 'नैष्कर्म्य' योगाचें इंगित कथन केलें; द्रुमिलानें भगवन्ताच्या लीलेचें वर्णन केलें. चमसानें 'अशान्तकाम' जीवांची गति सांगितली, व शेवटीं करभाजनानें भगवद्वतार, व त्यांची उपासना याचा विस्तार करतां करतां, द्वापार युगामध्यें श्रीरामावतारांत, भगवन्तानें जी अलौकिक लीला केली तिचें वर्णन केलें.

## रामाचें अलौकिक वागणें

त्यांची क्रिया लौकिक म्हणजे या मर्त्य लोकांतील जीवांच्या क्रियेप्रमाणें, (जीवांच्या तर्कशास्त्राप्रमाणें) घडत नाहीं, म्हणून त्यांचें तें कर्म अलौकिक गणलें जातें. अशा कर्माला-क्रियेला- व्यवहाराला 'अशक्य' असें उपलक्षण आम्ही सु (?) सुशिक्षित मंडळी सहज लावून टाकतों; पण जें घडलें म्हणून इतिहासाची साक्ष आहे, तेथें मात्र आमची फूटपट्टी कांहीं काम देत नाहीं.

श्रीरामाचें वागणें, करणें, सगळें अलौकिकच होतें; तरुण वय, नूतन विवाहित पत्नी, तिन्ही आयांचें जीवापलीकडे प्रेम, मर्जी सांभाळणारे तीन शूर बन्धु, इन्द्रासारखा समर्थ पिता, व स्वर्गतुल्य असें समृद्धराज्य, शब्द खालीं न पडूं देणारा असंख्य परिजनवर्ग, वसिष्ठासारखे महाज्ञानी कुलगुरु इत्यादि इत्यादि असंख्य गोष्टी मोह पाडणाऱ्या (सुदुस्त्यज) असूनही केवळ, सावत्र मातेला दिलेलें पित्याचें वचन खरें व्हावें, एवढ्यासाठीं राम सहजच अरण्यांत निघून गेले. अगदीं "जा" म्हटलें, गेले. पुढें काय होईल, तेथें राहण्याची काय व्यवस्था होईल, खायला-प्यायला काय मिळेल, याचा त्यांनीं कांहींच विचार केला नाहीं. राम हा खरा ज्ञानी होता. अशा ज्ञानी पुरुषांना स्वतःची अशी इच्छा नसतेच, केवळ यदृच्छा किंवा परेच्छेनेंच त्यांचें सगळें आयुष्य जात असतें. तर असें दुस्त्यज राज्य टाकणाऱ्या रामाला, कशाचा लोभ असणें शक्य आहे ?

## कुणालाही दुखवायचें नाहीं

स्वतःची इच्छा नाहीं, तरी दुसऱ्यांना दुखवायचें नाहीं, म्हणून, सीतामाई म्हणाल्या, "आर्या, तो हरिण मला आणून द्या ना !" झालें, धावले राम मृगाच्या मार्गे. कांही विचार करण्याची आवश्यकताच नव्हती ! "असंभवं हेममृगस्य जन्म" हें काय रामाला माहीत नव्हतें ? पण त्यांचें अलौकिकत्त्व येथेंच आहे. कुणाला दुखवायचें नाहीं. सर्वांकरितां आपण सारखें झिजायचें. रामायणांत, रामाच्या तरुणपणींचें वर्णन करतांना वाल्मीकि ऋषींनीं एके ठिकाणीं असें लिहून ठेवलें आहे कीं, एवढ्या सौख्याच्या राशीवर लोळत असतांनाही राम नेहमीं खिन्नच असायचा. त्याला कसली काळजी होती ? काळजी ही होती कीं, माझ्याकडून कुणावर जुलूम होत नाहीं ना ? कुणी दुखवलें जात नाहीं ना ? "कारण रामाला कष्ट होऊं नये, त्याची नाराजी होऊं नये म्हणून, राजवाड्यांत सर्वच लोक, राणीवंशातील सुद्धा, नेहमीं जपून सांभाळून वागायचे पण त्यांना आपल्यापासून उगांच त्रास नको, त्यांच्यावर दडपण पडूं नये म्हणून राम जपायचा, व आपल्या हातून कांहीं चुकून कुणाला दुखवलें गेलें नाहीं ना, म्हणून काळजी करणारा राम सदैव खिन्न असायचा !

काय सहृदयता ! आत्मवत् सर्वभूतेषु यः पश्यति स पश्यति । या भगवद्भक्तीचें आणखी कोणतें श्रेष्ठ उदाहरण असूं शकेल ! राम सर्वांना आपल्या ठिकाणीं पाहात होता, आपण आपल्या स्वतःला कधींच दुखवीत नाहीं, त्या दृष्टीनें कुणीही दुखावलें जाऊं नये म्हणून राम फार जपत असे.

## निष्कलंक रामचरित्र

यावर, रामचरितासंबंधीं अनंत आक्षेप निघूं शकतील--नव्हे निघालेही आहेत. रामानें सीतेला टाकून दिलें, त्या प्रसंगाची उपपत्ति एका महान् विद्वान भूतपूर्व शिक्षण मंत्र्यांनीं अगदीं भयंकर रीतीनें लावली आहे. ( ते आतां स्वर्गस्थ असून कदाचित् रामासन्निध असावेत, कारण ते श्रीरामाचे मोठे भक्तही होते ! ) ते आपल्या पुस्तकांत म्हणतात, राज्यावर आल्यावर रामाच्या भोंवती स्तुति पाठक जमले, व तो त्यांच्या कलानेंच वागूं लागला--अगदीं धुंद असा. एवढें कीं सीतामाईवर कांहीं आक्षेप आहेत, असें ऐकल्यावर त्यानें म्हणे, या आपल्या पाठक मंडळींना विचारलें व त्यांनीं सांगितलें "जाऊं द्या त्यांना रानांत इत्यादि--" आतां येथें रडावें कीं हसावें हेंच समजेनासें होतें ! कोठें भवभूतीचा उदात्त राम, व कोठें हा आजचा "क्षुद्र" राम ! अर्थात् हा दोष आपण कोणत्या रंगाचा चष्मा वापरूं यावरच सर्वस्वीं अवलंबून आहे. वरील प्रमाणें महान् शोध, गेल्या तीनचार हजार वर्षांत कुणाला लागला नाहीं ! मग ते काय सर्व निर्बुद्धच म्हणायचे ? कुणी कांहींही म्हटलें तरी, श्रीरामाचें चरित्र आहे तसेंच राहाणार आहे. अगदीं निष्कलंक. पवित्र. ये यथा मां प्रपद्यन्ते तान् तथैव भजाम्यहम् । देवाला शिव्या देणारे त्या कालांतही कांहीं कमी नव्हते. पण देवाचे देवत्व ओळखील तोच देव. " मूढा मां अवजानन्ति मानुषीं तनुमाश्रितम् । " हें थोड्या निराळ्या म्हणजे शब्दशः अर्थानें घेतलें तर, हें देवानेंच सांगून ठेवलें आहे, कीं माझी ओळख पटणें कठीण आहे. लोक मला साधा माणूसच समजतात !

येथें वाचक असा प्रश्न करतील कीं, हे लेखक रामाला 'देव' समजूनच लिहायला बसले आहेत ! राम तर तुमच्या आमच्या सारखाच आपल्या आईवडिलांच्या पोटीं जन्मला आला होता. तो तर एक मानव होता ! होय, तो मानव होता. पण दैवी तेजाची अभिव्यक्ती कोणत्याही मार्गानें होऊं शकते. प्रत्येक जन्मणाऱ्या व्यक्तीपुढें स्वतंत्र असें कांहीं एक कार्य योजून ठेवलेलें

असतें तसेंच रामापुढेंही होतें. मानवाशिवाय कोणाच्याही हातून आपणाला मृत्यु येऊं नये असा वर रावणानें आपला आजा ब्रह्मदेव याचेकडून मिळविला होता. रावणाच्या पित्याचें नांव पुलस्त्य ऋषि. हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र समजले जात. पुलस्त्याला पुष्पोत्कटा नांवाच्या राक्षसकन्येपासून रावण आणि कुंभकर्ण हे दोन मुलगे झाले. जसें कार्य तसें साधन. त्याकाळीं उत्तर भारतांत आर्यांची वस्ती बरीच वाढून कांहीं मंडळी हळू हळू दक्षिणेकडे पसरून आपल्या वसाहती करूं लागली होती. त्याला होते दोन अडसर; एक गगनभेदी पूर्वपश्चिम पसरलेला विस्तीर्ण विंध्याद्रि, व दुसरा तेथें व त्याच्या दक्षिणेस राहाणारे अनार्य. ते क्रूर व तामसी होते. त्यांना दया-माया नव्हती. पण आपल्या सौजन्यपूर्ण आचरणानें व तपोबलानें त्यांना आपलेसे करूं पाहाणारे बरेच ऋषिगण विंध्याच्या दक्षिणेसही येऊन राहूं लागले होते. तथापि त्यांचा सर्वसामान्य अनुभव मोठा उत्साहजनक अथवा आशाजनक नव्हता. त्याच सुमारास विश्वामित्र ऋषींनीं या भागांत एक यज्ञ सुरू केला होता. त्यांचा तो यज्ञ निर्विघ्नपणें पार पडेल कीं नाहीं याची त्यांना शंका येऊं लागली व कांहीं काळ तो यज्ञ त्यांनीं स्थगित केला. श्रीअग्निदेवाच्या प्रसादानें, दशरथ राजाच्या पोटीं तेजस्वी, शूर असे पुत्र झाले आहेत, हें विश्वामित्राला माहीत नसणें अशक्यच आहे. शिवाय त्याच वेळीं या क्षत्रियकुमारांचें मौंजीबंधन आटोपून ते सर्व प्रकारची दीक्षा घ्यायलाही पात्र झाले होते. विश्वामित्र उठले आणि दशरथासमोर जाऊन दरबारांत उभे राहिले. त्यांच्या उत्थापन—अभिवादनांत, हे मुलगेही अर्थात होतेच. त्यांना पाहिल्यावर ऋषींना अत्यंत समाधान वाटलें, व "कसें काय, कोठें आलांत ?" वगैरे औपचारिक प्रश्न राजानें त्यांना विचारायच्या अगोदरच त्यांनीं राजाळा त्याच्या वडील दोन पुत्रांची यज्ञरक्षणार्थ मागणी केली. पण माया मोठी कठीण असते. मोठा समंजस असलेला दशरथही गयावया करून ऋषींची क्षमा मागूं लागला व, "हीं मुलें लहान आहेत; त्यांनीं राक्षस कधीं पाहिले नाहींत, ते भिऊन जातील. त्यांचे वय काय, शक्ति काय····" इत्यादि सबबी त्यानें पुढें केल्या. पण विश्वामित्राचा निश्चय ठाम होता. त्यांनीं राजाची समजूत घातली व सांगितलें कीं "हीं तुझी मुलें तुला वाटतात एवढीं सामान्य नाहींत. शिवाय त्यांच्या रक्षणाची मी जबाबदारी घेतों. तूं मुलें पाठव." प्रत्यक्ष विश्वामित्रांनींच हमी घेतल्यावर दशरथाचा नाइलाज झाला, व लगेच दुसरे दिवशीं गर्ग—मुहूर्तावर (उजाडायचे अगोदर) ऋषि त्या दोघांना घेऊन

राजवाड्याबाहेर पडले व दण्डकारण्याची वाट चालूं लागले. वाटेंत जेथें जेथें मुक्काम पडे, तेथें ते दोघे विश्वामित्रांचें पादसंवाहन करून त्यांचा शीण घालवीत, व हें चालूं असतांना ऋषि त्यांना त्यांच्या पूर्वजांचा इतिहास, युद्धशास्त्र, राजकारण वगैरे शास्त्रांचे सिद्धांत सांगत असत. मध्येंच त्यांनीं त्या कुमारांना अस्त्रविद्या शिकवली व अशा रीतीनें त्या दोघांना असुरांशीं दोन हात करायला तयार केलें. त्यानंतरची त्राटिका-वध वगैरे हकीकत सर्वांनाच माहिती आहे. पण श्रीरामचंद्राच्या तेजाची खात्री पटली ती परशुरामाला. तो सर्वच प्रसंग मोठा स्फूर्तिदायक आहे म्हणून जरा विस्तारानें सांगण्याचा मोह टाळतां येत नाहीं.

झालें असें—श्रीरामानें शिवधनुष्याचा भंग करून स्वयंवर जिंकलें; रामाला सीता द्यायची तर ठरलें. लगेच दूत पाठवून जनकराजानें दशरथाला सहपरिवार बोलावून चौघां भावांचा लग्नसोहोळा, त्यांना आपल्या चारही कन्या देऊन थाटानें पार पाडला, व यथोचित पाहुणचार आटोपल्यावर वऱ्हाडी—मंडळी आपल्या घरीं---अयोध्येला जायला निघाली. बरोबरची ऋषिमंडळी आपापल्या कार्यासाठीं निघून गेली होती, व दशरथ राजा आपल्या राण्या, चार मुलें व चार सुना यांना घेऊन मार्गक्रमण करीत असतांच, एकाएकीं क्षितिजावर लालसर तेज दिसूं लागलें.

## परशुरामाचा नक्षा उतरविला

दिवस काळवंडला; कावळे कावकाव करूं लागले, व दिवस असतांही घुबडांचा घूत्कार सुरू झाला. राजा उतारवयाला लागला होता, व बरोबर जबाबदारी मोठी! हें काय लग्नांत विघ्न निर्माण झालें, म्हणून तो काळजींत पडला, व त्यानें त्या दिशेकडे घोडेस्वार पाठवून हें दुश्चिह्न कशाचें आहे, याची चौकशी करावयास सांगितलें. घोडेस्वारांना परत यायला फार वेळ लागला नाहीं. त्यांनीं सांगितलें, "महाराज, भगवान परशुराम अपमानित झाल्यासारखे अत्यंत क्रुद्ध दिसत आहेत, व ते आतां इकडेच येऊन पोंचतील." हा निरोप ऐकून राजा अक्षरशः घाबरला. ज्याला त्यानें जन्मभर टाळलें, तोच हा माथेफिरू उपस्थित झाला. पण राजा दशरथ हा फक्त एक सामान्य मानवच म्हणावा

लागेल. परशुराम जवळ आल्यावर कोठें आहे तो क्षत्रियाचा पोरगा ? त्यानें माझ्या गुरूचें, प्रत्यक्ष भगवान शंकराचे धनुष्य मोडून त्यांचा अपमान केला आहे ! त्यच्या या उद्दामपणाबद्दल त्याला शिक्षा झाल्याशिवाय राहाणार नाही ।" अशी गर्जना केली. झालें ! दशरथाची घाबरगुंडी उडाली. तो हात जोडून परशुरामाला म्हणाला, "महाराज माझा मुलगा लहान आहे, त्याच्या हातून धनुष्य वाकवतांच मोडलें. आपल्या गुरूंचा व भगवान शंकराचा अपमान करावा असा त्यांचा उद्देश नव्हता, तरी आपण त्याला क्षमा करा. " राम हें जवळून सगळें ऐकतच होता. त्यानें दशरथाच्या अजीजीकडे दुर्लक्ष केलें. निष्कारणच आपणावर उद्दामपणाचा आरोप घेणाऱ्या परशुरामाकडे त्यानें एकदां पाहिलें, व चटकन आपल्या धनुष्याला प्रत्यंचा चढवून तितच्याच आवेशानें म्हटलें, भगवान परशुराम, हा मी माझ्या धनुष्यावर बाण चढवला आहे. हा बाण सुटेल तेव्हां एक तर तुमचा स्वर्गाचा दरवाजा बंद होईल, नाहींतर तुमची सारी तपश्चर्या लोप पावेल. यापैकीं तुम्हीं काय निवडतां तें सांगा. रामाचा बाण कधींच मोघ (व्यर्थ) होत नसतो." असें रामाचें धिटाईचें आत्मप्रत्यय पूर्वक आव्हान ऐकतांच परशुरामाचा राग मावळला. त्यांना पूर्ण जाणवलें कीं हें काम साधेंसुधें नाहीं. अनपेक्षित अशा आव्हानानें ते गोंधळून गेले. रामाच्या तेजापुढें ते विचारातच पडले. त्यांना रामाच्या तेजाचा साक्षात्कार झाला ( खात्री पटली—मराठीत ); व क्षणभर विचार करून उतरलेल्या आवाजांत म्हणाले "रामा माझा स्वर्गाचा मार्ग बंद झाला तर मला त्याची पर्वा नाहीं. मी माझी तपश्चर्याच सांभाळीन" अशी अनुज्ञा झाल्याबरोबर रामाचा बाण स्वर्ग मार्गाला जाऊन, त्यानें परशुरामाचे स्वर्गाचें द्वार बंद केलें, व अजून परशुराम पृथ्वीतलावर हिंडत असतात—ते चिरंजीव आहेत, असें आपण म्हणतों.

## रामप्रभूसारखा रामच

एतावता, माणसाला, त्याचे गुण, त्याचें कार्य त्याची तपस्या, शौर्य धैर्य इत्यादि सर्व गुण त्याला देव बनवतात. रामाचें आचरण तर असें जगद्विलक्षण आहे कीं त्याच्या सारखा पुरुष अजून जगाच्या पाठीवर जगाच्या इतिहासांत झाल्याची कोठेंही नोंद नाहीं. गेल्या शतकांत कांहीं ख्रिश्चन मिशनऱ्यांनीं,

सीतेच्या शोधासाठीं व सुटकेसाठीं झालेल्या युद्धाची तुलना ट्रॉयची लढाई या युद्धाशी करण्याचा प्रयत्न केला. ट्रॉयचा राजपुत्र पॅरिस यानें सौंदर्य देवतेच्या कृपाप्रसादानें हेलेन नांवाची ग्रीस देशाच्या राजाची सून पळवली; पुढें तिच्या सुटकेसाठीं त्या दोन देशांत नऊ वर्षे युद्ध चाललें होतें. पण तो सारा इतिहास रामायणाच्या तुलनेनें इतका क्षुद्र आहे कीं रामचरित हे रामचरितच ठरले आहे. त्याला तुलनाच नाहीं. समुद्राला कशाची उपमा द्यायची व आकाशाशी कशाची तुलना करायची ?

गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः ।
रामरावणयो र्युद्धं रामरावणयोरिव ।।

सुभाषित.

★

कडक उन्हाळ्याकरिता बर्फतुल्य थंडगार सुवासिक व केशवर्धक

केलव्हिन्स लेमन क्रीम

केलव्हिन केमिकल कंपनी

१६७ ठाकुरद्वार रोड, मुंबई २

# मी वाचलेलें रामायण

लेखक : द. शं. टिपणीस

**श्री. द. शं. टिपणीस हे केवळ साईभक्त नसून श्री साईबाबांच्या तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केलेले निष्ठावान् लेखक आहेत. साईबाबा-प्रमाणें साईलीला मासिकावरही त्यांचें असामान्य प्रेम आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्या लेखनसेवेचा लाभ या मासिकास होत आला आहे. बाबांच्या प्रेरणेनें तो लाभ सतत होत राहो.**

**—संपादक**

भारतीय महाकाव्यांपैकी रामायण हें एक आहे. महाकाव्यांत तत्कालीन परिस्थिति, लोकांचे आचार विचार असतात, तसेंच मानवी मनाचे सूक्ष्म धागे, जीवन कसें खेळवीत असतात याचेंही दर्शन घडविलेलें असतें. महाकाव्यांत संघर्ष असतो. कोणत्या तरी संघर्षावर आधारलेली ती एक प्रदीर्घ कथा असते. या सर्व गोष्टी रामायणांत आढळतात. रामायण हा एक जीवनग्रंथ आहे. मानवी जीवन कसें असतें, व तें कसें जगावें, याचें चित्रण रामायणांत आहे. राम हा आदर्श जीवनाचें प्रतीक आहे. व तसा तो समजला जावा म्हणून राम हा तुम्हां आम्हां सर्वसाधारण मानवाप्रमाणें सुखदु:खांशीं जखडला गेला आहे. जीं सुखदु:खें आपण भोगतों तींच रामाच्या वांट्यास येतात. रामाला आनंद होतो. त्याला दु:ख होतें. तो शोक करतो. परमेश्वराचा अवतार तो. परमेश्वराला का दु:ख होतें ? आनंद वाटतो ? परमेश्वर तर निर्गुण, निराकार. रामायणांतील रामाकडे परमेश्वराचा अवतार म्हणून पाहिलें कीं, त्या रामाला सीतेसाठीं एवढा खटाटोप करायला कशाला पाहिजे होता ? रावणाला मारायला युद्ध तरी कशाला ? परमेश्वराचा एक कटाक्ष बस्स होता वगैरे शंका बुद्धिवाद्यांच्या मनांत येत असतात. रामायण वाचून मन असें शंकित राहिलें तर मग रामायण लिहिण्याचें वाल्मीकीचे श्रम वायां गेले असें म्हणावें लागेल. राम हा परमेश्वरी

अवतार आहे, असा विचार रामायण लिहितांना वाल्मीकीच्या मनीं असावा असें वाटत नाहीं. राम आदि व्यक्तींचें जीवन नेहमीच्या व्यावहारिक जीवनास धरूनच रंगविलें आहे

## जीवन कसें घालवावें

राम कोणीही असला, त्याची योग्यता कितीही श्रेष्ठ असली तरी रामानें आपलें जीवन कसें व्यतीत करावें यासंबंधीं वसिष्ठ मुनीनें रामास जें सांगितलें तें ध्यानीं घेण्यासारखें आहे. राम वनवासास जाण्यापूर्वींची घटना आहे. या जीवनांत कांहीं अर्थ नाहीं. जीवनव्यवहार म्हणजे एक निरर्थक खटाटोप आहे. त्यांतून निवृत्त व्हावें. सन्यास घ्यावा. असे क्रियाशून्य निराशावादी विचार रामाच्या मनांत थैमान घालूं लागले. उदास होऊन तो कोणत्याही व्यवहाराकडे लक्ष देईना. अशाच निराशेनें व भ्रांतीनें अर्जुनाला घेरलें होतें. त्यावेळीं श्रीकृष्णानें समजूत घातली व त्यांतून गीतेचा जन्म झाला. त्याचप्रमाणें रामाची समजूत घालण्याचें काम वसिष्ठ मुनीनीं केलें. त्यांतून योगवासिष्ठाचा जन्म झाला. मी वागावें तरी कसें हें थोडक्यांत सांगा, असें रामानें विचारल्या-वरून वसिष्ठ मुनि रामास सांगतात, "मनानें प्रपंचांतून सुटलेला पण देहानें प्रपंचांत गुंतलेला, मनांत आत्मज्ञान जागे असलेला पण देहानें ज्ञान नसल्या-सारखे वागणारा, मनानें एका आत्मवस्तूला सत्य मानणारा आणि देहानें बहुरंगी जग सत्य मानणारा अशी प्रपंच परमार्थाची बेमालूम जोड घालून रामा, तूं आपलें जीवन घालव." (अध्यात्मदर्शन-बेलसरे) रामजीवनाकडे कोणत्या दृष्टीनें पहावें हें यावरून समजून येईल. परमेश्वरी अवतार खरा पण राम जगला तें मानवी जीवन जगला. ही घटना राजवाड्यांतील रामाच्या सुखी जीवनांत घडलेली आहे. यानंतर कैकेयीच्या किंतूमुळें वनवासी जीवन येऊन रामाच्या जीवनांत संघर्ष निर्माण झाले.

## जीवनांत संघर्ष पाहिजे

परमेश्वरतुल्य मानव्य मानवाच्या ठिकाणीं असूं शकतें. पण या मानव्याला मानवी मर्यादा व बंधनें असतात, ही गोष्ट आपण लक्षांत घेत नाहीं. म्हणून रामकृष्णादि अवतारांसंबंधीं नाना शंका बुद्धि निर्माण करीत असते.

रामायणांतील राम हा मानवदेहधारी परमेश्वर आहे. व मानवाप्रमाणेंच तो जीवन व्यतीत करतो ही दृष्टी ठेवून रामायणाकडे पाहिल्यास मानवी जीवनाचे उंचनीच टप्पे, भावनांचे हुतूतू, विचारांच्या लंगड्या व त्यांतून निर्माण होणारे संघर्ष यांचा प्रत्यय येऊन जीवनाचा हा खेळ किती रंगतदार आहे हें दिसून येते. जीवनांतील सुखदुःखादी घटनांचा पुनः प्रत्यय जेथें येतो तिकडे मानव आकर्षित केला जातो. मग तें नाटक असो, कादंबरी असो नाहींतर महाकाव्य असो, हजारों वर्षें झाली तरी रामायण, महाभारत काव्यें अजूनही लोकांना आकर्षित करतात त्याचें कारण हेंच. रामायण हा एक जीवन संघर्षाचा चित्रपट आहे. जीवनाला खरी गोडी संघर्षामुळें येते. मिठाशिवाय स्वयंपाकाला चव नाहीं तद्वत् व्यवहारांत संघर्षाचा मिठाचा खडा पडल्याशिवाय जीवनाला खुमारी नाहीं. संघर्षाशिवाय जीवनांत पराक्रम दाखवायला, बुद्धि कौशल्य लढवायला तेज प्रगट करायला संधि मिळत नाहीं. ज्यांना संघर्ष नाहीं तें आळणी जीवन. आळणी स्वयंपाक कोण खाईल ? असलें जीवन जगावें असें कोणत्या पराक्रमी माणसास वाटेल ? चांगल्या वाईट मनोवृत्तींच्या संघर्षामुळें रामायण हृद्गत वाटतें.

## रामायणांत कशाचें दर्शन घडतें ?

रामायणांतील सर्व व्यक्तींच्या मनोवृत्तीचा समुच्चय म्हणजे मानवाची त्रयी ( मन बुद्धि अहंकार ) होय. दशरथाची धर्मनीति व सोज्वल वृत्ती, जीवन जसें असेल तसे स्विकारले पाहिजे ही रामाची दृष्टी व जीवनास पाहिजे ती कलाटणी देण्याची त्याची वीरवृत्ती, लक्ष्मणाचें बंधुप्रेम, भरताची न्याय निष्ठुरता, सीतेची शालीनता, पतिप्रेम, कौसल्येचा सज्जनपणा, कैकयीचा मी–तूं पणा, मंथरेची कानफुंकण्याची वृत्ती, नाना साधना करून देवांनाही भारी होणारे सामर्थ्य मिळवल्यामुळें रावणाच्या ठिकाणीं निर्माण झालेला अहंकार व आकाशालाही गवसणी घालण्याची त्याची वृत्ति, बिभिषणाचा झोपाळुपणा–आळस, मारुतीची स्वामीनिष्ठा, पतिविरह धीरानें सहन करण्याची उर्मिलेची सहनशील वृत्ति, वगैरे सर्व गोष्टी मिळून मानवी अंतःकरण बनलेलें आहे. व्यक्तीच्या ठायीं त्यांचें कमी जास्त प्रमाण असते. अधिक्यावर तो कसा हें ठरविलें जाते

पुढेच. अशा प्रकारें मानवी चित्तांत राम आहे, सीता आहे, कैकयी मंथरा आहेत, मारुती आहे, उर्मिला आहे, रावण आहेच व बिभिषणही आहे. मानवी भावनाचें, विचारांचें व विकारांचें दर्शन आपणांस रामायणांत होतें. रामायणांतील घटना म्हणजे मानवी जीवनांत नित्य दृष्टीस पडणाऱ्या घटनाच आहेत. आजच्या घटनांच्या मागील मानवी वृत्ति व भावना लक्षांत येणें कठीण होतें. यामुळें असें कां असें कोडेंही आपणांस पडतें. पण तत्सम घटना ( रामायणांतील ) जाणून घेतल्या तर नित्य व्यवहारांतील जीवनांतील अनेक घटनांचे मानस शास्त्रीय संबंध ध्यानांत येऊं शकतात व त्यामुळें जीवनाचे नवीन नवीन धडे आपण शिकूं शकतों.

## सीतेचा विरह जाणवला

आश्रमांतून सीता नाहींशी झाली व शोधूनही ती सांपडत नाहीं हें पाहून रामाची जी विरहावस्था झाली ती आजही आपण समाजांत पाहूं शकतों. विरह-ताटातूट ही जीवनांत केव्हां ना केव्हां तरी येणारी गोष्ट आहे. निस्सीम व अति-प्रेमामुळें ही विरहावस्था कित्येक वेळां भ्रमिष्टपणांत पदार्पण करते. सीतेवरील निस्सीम व गाढ प्रेमामुळें राम विरहावस्थेमध्यें भ्रमिष्टपणें वागतांना दिसतो. तो झाडांशीं बोलतो व त्यांना सीतेबद्दल विचारतो. ते बिचारे मुके. मूकस्तंभा-सारखे उभे. बोलत नाहींत. म्हणून राम त्यांना दोष देतो. वनचरांना सीतेची खुशाली विचारतो, सीता गेल्याचा दोष त्यांच्या हलगर्जीपणावर लादतो. अशा प्रकारचें सुंदर काव्यात्मक वर्णनानें रामायणांत आहे. त्याचा उद्देश हा कीं, प्रेमापायीं येणाऱ्या विरहावस्थेमुळें शहाणेसुरते मानवही कसे भ्रमिष्टपणें वागतात हें दाखविण्याचा आहे. विरहाची ही अवस्था म्हणजे बुद्धीनें भान हरपल्याची व संयम सुटल्याची द्योतक आहे. यामुळें मानव विचारहीन होऊन आपण कोण व काय हें विसरून लोकनिंदेचें भय न बाळगतां कसाही वागूं लागतो. अशा विरहामुळें आत्मघात करून घेतल्याची थोडीथोडकी उदाहरणें नाहींत.

## साऱ्या मानवी भावना

आपल्या हातून कांहीं गंभीर चूक घडली तर कित्येक लोक ती हिरीरीनें नाकबूल करतात, कित्येक प्रामाणिक व सदसद्विवेकबुद्धी जागृत असणारे ती

कबूल करतात, कित्येकांची वृत्ति नसतील त्या चुका आपल्या पदरीं बांधण्याची असते. विरह व शोकामध्यें ही वृत्ति दिसून येते. अशा वेळीं नसतील त्या गोष्टी माणूस आपल्या अंगावर घेतो. मानवी मनाचा हा नमुना, 'मी याला जबाबदार आहे ' असे जे रामानें उद्गार काढले त्यांत दिसून येतो. "मी वनांत आलों म्हणून सीतेवर असा प्रसंग आला. जटायूसारख्या वीराला मरण आलें. लक्ष्मणा, हें सगळें माझ्यामुळें झालें रे!" हें सर्व वाचनांता कोणी परमेश्वर बोलत नसून मानव बोलत आहे अशी भावना होते. मानवी दुःखाचा आपल्यास पुनःप्रत्यय येतो म्हणून रामाची ही विरहावस्था मनाला स्पर्शून जाते. देवाधर्माचा आदर करणारा असतो तो राम, गुरुजनांना मानणारा असा तो राम जगाकडे समबुद्धीनें व उदारपणें पहाणारा असा तो राम. पण तो राम विरहामुळें देवधर्मालाही दोष देतो कीं, माझ्या सीतेचें रक्षण त्यांना करवलें नाहीं. काय कामाचा हा देव आणि काय करायचा असला धर्म? हें जगच मुळीं खराब आहे. त्याचाच नाश करून टाकतों. रामाच्या विरहांत व्यक्त झालेली ही मनोवृत्ति व्यवहारांत आपणास हरघडी दिसत नाहीं काय? घरोघरीं ती आपणांस आढळून येईल. कांहीं वाईट घडलें कीं त्याचा मालक देव. देव दुष्ट आहे, निर्दय आहे, झोपला आहे. कसले हे देव आणि कसला हा धर्म, असेच वैतागानें कां होईना मानव उद्गार काढीत असतो. दुःखविरहामध्यें माणसाचें मन कसें वागत असतें याचें चित्र रामविरहांत आपणास पहावयास मिळतें.

## जटायूची निष्ठा

आणि जटायू! रामायणांतील बड्या व्यक्तींच्या व्यक्तित्वापुढें किती लहान वाटतो. पण त्यानें दाखविलेल्या निष्ठेला मोल नाहीं. आपल्या प्रभूला सीतेचा ठावठिकाणा सांगण्यासाठीं केवळ रामनिष्ठेच्या जोरावर मृत्यूला दूर ठेवून जीव तगवून धरणाऱ्या त्या जटायूची हकिकत वाचतांना शिवप्रभूची खुशाली कळेपर्यंत जखमांनीं तळमळत असतांही जीव तगवून धरणाऱ्या पावनखिंडींतील त्या वीर बाजीप्रभूची कोणास आठवण होणार नाहीं? रामाचा जटायू हाच पुढें शिवप्रभूचा बाजीप्रभु झाला कीं काय न कळे! मानवी मनाच्या निष्ठावंत वृत्तीचे हे नमुने आहेत. निष्ठा पराक्रमाच्या उंच शिडीवर

किती चढूं शकते व लोककल्याण कसें साधूं शकते, हें यापासून शिकावें. राम, लक्ष्मण, भरतापुढें जटायूला रामायणांत लहानशा कोपऱ्यांत स्थान मिळालें आहे. असे कैक जटायू आजही असतील पण बड्याबड्यांपुढें ते कोपऱ्यांतील पणत्या वाटतात खऱ्या पण वेळ आली तर याच पणत्या सूर्याच्या तेजानें तळपून जातील व जटायूप्रमाणें पुढील इतिहासाची वाट मोकळी करतील. ऊर्मिला! लक्ष्मणाच्या पतिप्रेमाला मुकलेली. पति असून नसल्यासारखी तिची स्थिति. सीतेला वनवासांत कां होईना पण रामसहवासाचें सुख होतें पण ऊर्मिला मात्र विरहाचें दुःख मूकवृत्तीनें सोशीत होती. जिथें राघव तिथें जानकी हें सीतेचें तत्त्वज्ञान तर प्रभु सेवेला गेलेला पति इथें ना तिथें देवाप्रमाणें दोन्ही ठिकाणीं आहे असें समजून पति भक्तिपूर्वक आपली कर्तव्यें प्रभुसेवेच्या भावनेनें करणें हें ऊर्मिलेचें तत्त्वज्ञान. ऊर्मिलेचा राजवाड्यांतील वनवास हा सीतेच्या वनांतील वनवासापेक्षां अधिक हृदयस्पर्शी वाटतो. जें जसें आलें तें तसें घेतलें व मूकवृत्तीनें सोसलें, ही संतांची सहनशीलता असलेल्या व्यक्ति समाजांत पहावयास मिळतात. स्त्रीयांची ही मूळ सोशीक वृत्ति असलेला आपला बहुसंख्य समाज ऊर्मिलेच्या रूपानें रामायणांत दिसू शकतो. नामभक्तीमुळें बाहूंत किती बळ येऊं शकतें तें मारुती दाखवूं शकतो. नामभक्तीनें आध्यात्मिक ताकद येते तर ब्रह्मचर्यानें शारीरिक बळ वाढतें. कशी व किती तें हनुमानांत पहावें. भक्ति व ब्रह्मचर्य हीं एकमेकांस पोषक आहेत. जिथें ही दोन्ही नांदतात तिथें कळिकाळालाही भेदण्याची ताकद असते. ही भक्ति तरी किती उच्च! भक्तीपुढें सोनें रत्नेंही तुच्छ मानून त्याचा चुराडा करून तें फेकून देणारा तो हनुमान! प्रभूपुढें केवढेही व कसलेही ऐहिक वैभव तृणवत् नव्हे विषासमान मानणारे तुकाराम, समर्थादि संत कलियुगांतील हनुमानच नव्हेत तर काय? मारुतीच्या मदतीनें रावणवध करून रामानें लंका जिंकली तर या हनुमंतांच्या मदतीनें रावणसत्तेचा नाश करून शिवप्रभूनें स्वराज्याची सोन्याची लंका जिंकली. माकडांतच मारुती असतो असें नव्हे तर मानवांतही असूं शकतो. राष्ट्रांत जेवढे हनुमान अधिक होतील तेवढा राष्ट्रांतील राम अधिकाधिक पराक्रम करूं शकेल. रामायणांतील हनुमान अनेक रूपांनीं जेव्हां आमच्या समाजांत वावरूं लागेल तेव्हां रामायण आमच्या पचनीं पडलें म्हणावयाचें. नाहींतर कोरडीं कीर्तनें व कोरडीं प्रवचनें एवढेंच.

## भोळ्या शबरीची भावडी भक्ति

शबरी म्हणजे भोळीभावडी प्रामाणिक भक्ति. येईल, राम येईल व भेटेल या जाज्वल्य निष्ठेनें डोळ्यांत प्राण आणून रामाची वाट पाहाणारी शबरी भिल्लीण अस्पृश्य समजली जात होती. तिच्या हातचीं बोरें आणि तींही उष्टीं-रामानें खाल्लीं. कारण त्या उष्ट्या बोरांत शबरीचीं रामभक्ति वात्सल्यानें भरली होती. देवाघरीं वात्सल्यभक्तीला मोठें स्थान आहे. मग ती अडाण्याची भोळी-भावडी असो कीं पंडिताची ज्ञानयुक्त असो. भावनेच्या पावित्र्यावर जीवनाचे सुंदर इमले उभे राहूं शकतात. पण रामायणांतील या शबरीकडे व रामानें तिला दिलेल्या जवळकीच्या नात्याकडे आम्ही सोईस्करपणें दुर्लक्ष करीत आलों आहोंत; कारण आमच्या मनोवृत्तीशीं ती सुसंगत नाहीं. उष्टी बोरें खाल्ल्यानें आपलें पावित्र्य ढळण्याची खुद्द रामाला कधीं भीति वाटली नाहीं पण आम्ही मानव मात्र अस्पृशांच्या स्पर्शानें आमच्या रामाचें पावित्र्य ढळेल कीं काय या घोर चिंतेंत वर्षांनुवर्षें घोरत पडलों आहोत. यामुळें राम आमच्यापासून चार हात दूर राहिला आहे. रामयणांतील तो प्रसिद्ध धोबी! सीतेचे कपडे एकदांच धुतले त्यानें, पण केवढा संघर्ष निर्माण केला! दुसऱ्याच्या पावित्र्शाची उठाठेव करणारी वृत्ति म्हणजे धोबी. धोबी आजही समाजांत भरपूर आहेत. एवढेंच नव्हे तर त्यांनीं आतां मोठमोठ्या वॉशिंग कंपन्या (अड्डे) काढल्या आहेत. दुसऱ्यांचे कपडे धुऊन पांढरे स्वच्छ करणें हा या धोब्यांचा नित्याचा उद्योग असला तरी स्वतः मात्र मळकट कपडे वापरण्याकडे यांची वृत्ति असते.

## रामायणांतील बिभीषण

बिभीषण तर झोपाळू. रामभक्त पण त्याची झोपाळू भक्ति. निष्क्रिय भक्ति. रावणाच्या अहंपणाला अटकाव करणारी ही भक्ति जेव्हां झोपते तेव्हांच अहं मला वाटेल तें करायला फावते. आज हा समाजरूपी बिभीषण झोपला आहे. भक्ति आहे, निष्ठा आहे, पराक्रम आहे पण झोपही आहे. त्यामुळें निष्क्रिय. त्यामुळें अनेक अहं वावरताहेत. लोकमान्यांनीं जागा केला, महात्मा गांधींनीं हलवून ओरडून ओरडून जागा केला. उठला. पराक्रम केला. पण

पुन्हा झोपला. आळसामुळें असें होतें, व असें झालें कीं राजकारणांतील रावण मोकळे सुटतात. ही झोप उडाल्याखेरीज वाईटाचा नाश होणार नाहीं. रामायणांतील बिभीषण आपणांस हें सागतो.

आणि आतां रावण. रावण म्हणजे अहं समजतात. पण एवढेंच समजून उपयोगी नाहीं. रावणाच्या रूपानें आजच्या युगांतील एक सत्य रामायणांत खडें केलें आहे. रावण अभिमानी तर खराच. पण हा अभिमान कां आला? सामर्थ्यामुळें. फुकाचा गर्व नव्हता तो. सामर्थ्य, शारीरिक व मानसिक ताकद आहे, मागें दैवी शक्ति आहे त्यानें मस्ती करावी. ती शोभून दिसेल. त्यानें इतिहास घडेल. राम होतां येत नसेल तर रावण व्हा. तसें सामर्थ्य मिळवा व रावण व्हा. पण फुकाचा गर्व मिरवूं नका. रावण झाला तरी रामाचेंच विरुद्ध अंग. विरोधी भक्ति होती त्याची. भक्ति होती खरी अगदीं श्रेष्ठ दर्जाची. परि जागा चुकलासी असें होतें. रावणाच्या शिवभक्तीला तोड नाहीं. कर्मठपणा असेल. त्यामुळें अहंकारही असेल पण त्याच्या भक्तीला भोळासांब भुलला हेंही तितकेंच खरें. संत व रावण थोड्याफार फरकानें एकपरी सारखेच म्हणावयाचे. दोघेही देवभक्त. पण एकाचा गर्व गळालेला असतो तर दुसऱ्याचा फोंफावत असतो. एक आपल्या सामर्थ्याचा उपयोग आध्यात्मबाढीकडे व लोककल्याणाकडे करतो तर दुसरा ऐहिक वैभव व सुखोपभोग मिळविण्याकडे त्याचा उपयोग करतो. एकाच्या भक्तीपायीं देव त्याच्याकडे धांवत जातो तर दुसऱ्याच्या अहंच्या तडाख्यांत सापडेल्या भक्तीची सुटका करण्यासाठीं अयोध्येहून लंकेला जातो. असलें हें सामर्थ्य रावणाला मिळालें तरी कसें? स्वपराक्रमानें, तपश्चर्येनें, स्वकष्टानें त्यानें तें मिळविलें. त्याच्या जोरावर देवाशीं झुंज घेतली. असले सामर्थ्यवान रावण आजही जगांत आहेत. बुद्धीच्या तपश्चर्येच्या जोराबर ते देवाला जिंकूं पहात आहेत. ऐहिक दृष्टचा जगाला वैभव व सुख प्राप्त करून देत आहेत पण त्याचबरोबर ते जगाला विनाशाकडेही नेत आहेत. त्यांची भक्ति आहे, निष्ठा आहे. पण ती ऐहिक ज्ञानाची म्हणजे अज्ञानाची. रामाची-खऱ्या ज्ञानाची नाहीं. उलट तिला विरोध आहे. हा विरोध शिगेला गेला कीं, राम प्रकट होईल व अंतीं जगाचें कल्याण होईल. पण आज तरी विज्ञानाच्या तपश्चर्येमुळें मिळविलेल्या सामर्थ्याच्या जोरावर परमेश्वरी शक्तीशीं

शर्यत खेळण्याची इर्षा मानवानें धरली आहे. रामायणांतील रावण आज जगांत वावरत आहेत. त्यांच्या सामर्थ्यामुळें दिपून सर्वसाधारण समाज आदरानें त्यांच्यामागें जात आहे. त्यामुळें त्याचें रामाकडे दुर्लक्ष होत आहे.

**रामायणाचा संदेश हाच कीं, आपण रावणाचें शिष्यत्व सोडून पण त्याचें सामर्थ्य घेऊन रामाचें शिष्यत्व पत्करावें व ऐहिकाची उभारणी अध्यात्मावर करून आपण आपलें जीवन सुखी व कल्याणकारी करावें.**

## मानवजन्माचें सार्थक

आपलें शरीर हें साधना करण्यासाठीं आहे. ज्यानें साधनसंपत्ति जमविली त्यानें आपल्या शरिराचा योग्य उपयोग केला असें म्हणतां येईल. त्या साठींच तर जगायचे. भोग, विलास, वासना शरिराला चिकटलेल्या आहेत. विषय वासना थैमान घालीत आहेत. त्यांच्याशीं झुंज देऊन त्यांत विजय मिळविणें यांतच मानव जन्मांचें सार्थक्र आहे.

## शरीर व संसार

आपलें हें शरीर व ज्यांत आपण वावरतों तो किंवा आपल्या सभोवती पसरलेला संसार, व्याप यांचें सत्यस्वरूप काय आहे हें आपण समजून घेतलें पाहिजे. म्हणजे मग जिवंत रहाण्याची आशा किंवा मृत्यूनें भय आपणास वाटणार नाहीं. हें नाशवंत शरीर राहिलें काय किंवा पतन पावलें काय, दोन्हीं गोष्टी सारख्या आहेत.

# रामजन्मोत्सव व साईबाबा

लेखकः––डॉ. के. भ. गव्हाणकर

डॉ. केशवराव गव्हाणकर हे श्रीसाईबाबांचे निष्ठावंत व फार जुने भक्त आहेत. बाबांच्या शिकवणुकीचा त्यांनीं आपल्या परीनें सखोल अभ्यास केला आहे. दोन अडीच वर्षांपूर्वीं त्यांनीं साईबाबांचें एक विस्तृत व वाचनीय चरित्र बुद्धिवादी विचारपद्धतीनें लिहून प्रसिद्ध केलें आहे.

—संपादक

आर्यांच्या सणांची गुढी, गुढीपाडव्यानें उभारिली. तशी प्रभुरूपाच्या बोधामध्यें संतांनी सर्व जगावर गुढी उभारिली आहे. 'उभारिला ध्वज तिहीं लोकांवरीं' असें केवळ त्यांच्या श्रेष्ठ बोधानें म्हणतां येतें. शिरडींमध्ये सद्गुरु साईबाबानीं भागवतधर्माची गुढी श्रीरामजन्माने उभारली.

**'श्रीराम' नाम रमवी हृदयीं जनांसी**
**'श्रीकृष्ण' नाम प्रतिकर्षहि तेवि कर्षी ॥**
**ऐक्यांत ने हरूनियां 'हरि' नाम जें कां**
**'श्रीरामकृष्णहरि' तारक सर्व लोकां ॥**

—हरिदास–आख्यान

भागवतधर्मांतील हा तारकमंत्र आबालवृद्धांच्या तोंडीं आहे. या मंत्रानें कोठ्यवधि जीवांना प्रभुसुखाची प्राप्ति झाली आहे. यांत एकाच जगन्नियंत्याचीं तीन नामें आहेत. 'राम' नामांत रमविण्याचें सामर्थ्य आहे. हृदयामध्यें

रमविणारा तो प्रभु आहे. त्या प्रभूची आठवण करून तें रमविणारें सुख जागें करणारा हा मंत्र आहे. श्रीज्ञानेश्वरींत म्हटलेंच आहे 'तैसा हृदयामध्यें मी रामु ! असतां सर्व सुखांचा आरामु ॥' श्रीज्ञाने. अ. ९ सर्व सुखांचा आराम 'राम' प्रत्येकाच्या हृदयांत आहे त्याचें हे नांव आहे. प्रत्येक कर्म करण्यापूर्वी कर्माकडे ओढून नेणारी व कर्म होत असतां सुखविणारी जी गोडी असते तिचें नांव 'कृष्ण' होय. सर्व गोडी जेथून उगम पावते व कर्मानंतर जेथें मुरून असते त्या ऐक्यसुखाला 'हरि' हे नांव आहे. सर्व कल्पनांचें कर्माचें हरण या ऐक्यांत होतें. या रीतीनें कर्मापूर्वी हृदयांत रमणारें, कर्मांत व्यक्त होणारें, व परत ऐक्यांत जाणारें जें प्रभूचें सुख आहे त्याची आठवण व जागृति व 'रामकृष्णहरि' या नामाने होते. 'साखर' या नांवानें जिभेंतली साखरेची आठवण जागी होते. त्याचप्रमाणें आपल्या अंगींच असलेल्या प्रभुसुखाची जाग या 'रामकृष्णहरि' नाममंत्रानें होते. साखर बाहेरून जिभेवर ठेवावी लागते. प्रभुसुख अंगींच असल्यामुळें केवळ स्मरणाबरोबर तें सुख भेटूं लागतें. मुलाच्या स्मरणाबरोबर मुलाचा कळवळा व त्या कळवळ्याचें सुख आईला भेटतें, तसें प्रभूचें सुख या नामस्मरणाबरोबर भेटूं लागतें.

## बाबांची मनीषा

जें सुख ठाऊक आहे त्याच्याच स्मरणानें त्याची रुचि जागी होते. परदेशांतल्या ठाऊक नसलेल्या एखाद्या फळाचें नांव घेतलें तर त्या फळाची रुचि, रस जिभेंत उतरणार नाहीं. त्याचप्रमाणें प्रभूचें रूप आपल्यामधें कोणतें आहे तें पटलें म्हणजे स्मरणाबरोबर गोडी उदय पावते. त्यासाठीच 'राम' या नांवाने आपल्यांत प्रभूचे कोणतें रूप आहे 'कृष्ण' या नांवाने कोणत्या सुखाचा अनुभव आपणाला आहे, 'हरि' या नांवानें कोणत्या सुखांत आपण मुरून जातों या खुणा एकवार कळल्या पाहिजेत. किंवा त्याची गोडी अनुभवली पाहिजे. यालाच नामाचें रूप असें म्हणतात. मनुष्याचें नांव त्याच्या रूपाची आठवण करून देतें. रूप म्हणजे त्या मनुष्याच्या ज्ञानाची, आनंदाची, मनाची, देहाची अशी सर्व स्थिति. नामानें रूप आंठवते व रूपाच्या गोडीनें नाम मुखावर येतें. 'रामकृष्णहरी' या नांवाचें रूप 'रमविणारें' 'आकर्षणारें', व 'ऐक्यसुखांत नेणारें' असें वर दाखवलेंच आहे. हें सुख प्रत्येकांत आहे, तें सुखच गोड आहे

अशी नजर प्रत्येकाला येणें हा बोध या युगांत व्हावा अशी मनीषा बाबांची असावी. अमुक एका गोष्टींत सुख आहे असा अनुभवाचा–गोडीचा–निश्चय होतो तेव्हां मनुष्य आपला सर्व जीव त्या सुखासाठीं ओततो. 'रामकृष्णहरि' या नामाने आपणांतच कोणतें सुखाचें रूप भेटतें हे अनुभवणें, हा अनुग्रह घेणे आहे व ही गोडी रुचींत व बोधांत आणून देणें हा अनुग्रह देणे आहे. 'श्रीराम' जन्मोत्सवानें बाबांनी हेंच सिद्ध केलें आहे.

'रामकृष्णहरि' या नाममंत्राची देवता याप्रमाणें प्रत्येक जीवांतच आहे. ती बाहेरच्या देवांची उपासना नव्हे. अंगींचा काम तारुण्याने अंगींच जागा व्हावा लागतो. त्याप्रमाणें बोध तारुण्यानें या सुखाची रूचि भेटते. 'रामकृष्णहरि' नामाची देवता ही सतत हजर आहे. प्रत्येकाजवळ आहे. 'राम' या नावाने अयोध्यानिवासी व येथून गेलेला देव 'कृष्ण' या नांवानें गोकुळांतला व हल्लीं नसलेला देव असा अर्थ नाहीं. हृदयांत असलेला कर्मांत व्यक्त होणारा देव ( सध्यां माझ्या जवळ असलेला ) त्यानेंच तीं रामकृष्ण अवताराची रूपें घेतली होतीं असें म्हटलें तर चालेल, पण देवतेचें अखंड अस्तित्व प्रत्येक जीवांत आहे व त्या सुखाचा ठिकाणा व रुचि जीवाच्या अनुभवांत व बोधांत येणे अवश्य आहे, त्यानेंच प्रभुचें अखंड व अविनाश सुख भोगतां येतें हे या 'रामकृष्णहरि' व रामजन्मोत्सवाचें कार्य आहे.

> **द्वापरांते नारदो ब्रह्माणं जगाम ।**
> **कथं भगवन् गां पर्यटन् कलिं संतरेयमिति ।**
> **सहोवाच ब्रह्मा, साधु पृष्टोस्मि सर्व श्रुतिरहस्यं**
> **गोप्यं तच्छृणु ॥**
> **येन कलिर्संसारं तरिष्यसि ॥**
> **भागवत आदिपुरुषस्य नारायणस्य नामोच्चारण-**
> **मात्रेण निर्धूत कलिर्भवति ।**

## तरणोपायाची गुरुकिल्ली

द्वापाराचे शेवटीं नारदमहर्षि ब्रह्मदेवाकडे गेले व वंदन करून त्यानीं अत्यंत विनयानें प्रश्न केला कीं, हे भगवन् कलियुगांत मनुष्यमात्रांचा तरणोपाय

कशानें होईल ? यज्ञयाग, ध्यानधारणादि अष्टांगयोग व निरनिराळीं साधनें मानवांकडून अशक्य होईल तेव्हां त्यांचा तरणोपाय कसा होईल असा प्रश्न करतांच ब्रह्मदेव संतुष्ट झाले व म्हणाले, "हे साधो ! तुला मी आतां वेदश्रुति यांचे गुप्त रहस्य सांगतों, ज्याच्यामुळें कलियुगांत मानवास सहज तरून जातां येईल. कलीचे पाश, भवसागर इत्यादि भीतीनें त्रस्त झालेल्या जीवांस आदिपुरुष श्रीभगवान् नारायण यांच्या फक्त नामस्मरणानेंच सहज करतां येईल."

**नारदः पुनः पप्रच्छ । तन्नाम किमिति ? ।**

नारदांनी पुन्हां विचारलें, भगवन् त्या नारायणांचे कोणत्या नामाचा हा महिमा आहे; तें कोणते नाम आहे त्याचे यथार्थ कथन करा.

सहोवाच हिरण्यगर्भः—

**हरे राम हरे राम राम राम हरे हरे**
**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे**

भगवान् ब्रह्मदेवांनीं 'हरे राम' हा मंत्र नारदास सांगितला. हें ऐकूण नारदांनीं पुन्हां प्रश्न केला कीं, 'भगवंकोध्य विधिरिति' कोणत्या विधीनें या मंत्राचें अनुष्ठान होईल ? ब्रह्मदेव म्हणाले 'नास्य बिधिरिति'। 'सर्वदा शुचिरशुंचिर्वा पठन् ।' या मंत्रास विधीची अपेक्षा नाहीं. हा मंत्र सर्वकाळ जपावा.

## आजची समाजस्थिति

ज्याप्रमाणे धान्याच्या तुसामध्यें बी (राम) नसल्यामुळें तें फुकट आहे, त्याप्रमाणें सध्यां वाईट आचरणामुळें कोठेंहि सार राहिलें नाहीं. ब्राह्मणांनी धान्याच्या लोभानें घराघरांतून भगवतकथा सांगितल्यामुळें त्यांतील सार नाहींसे झाले आहे. भयंकर पाप करणारे आणि नास्तिक लोकहि तीर्थक्षेत्रांत राहिल्यानें तीर्थाचें सारहि नाहींसें झालें आहे. काम, क्रोध, आणि लोभ यानीं व्याकुळ झालेलें लोकहि तपश्चर्या करूं लागल्यामुळें तपांतील सार (राम) नाहींसे झाले आहे. पंडित स्त्रीपुत्रांतच रममाण झाल्यामुळें मोक्षमार्गाकडे त्यांचे लक्ष नाहीं; आणि सांप्रदायिक वैष्णवधर्माचा लोप होत असल्यामुळें, सर्व वस्तूंतील सारच नाहींसें झालें आहे. अर्थात हा युगाचाच धर्म असल्यामुळें कोणाला नांवे ठेवणार ?

म्हणूनच भगवान् साईने 'राम' नाम अनुभवण्याकरितां शिरडी मध्यें रामजन्मोत्सव सुरु केला.

देवांमध्यें श्रीराम अवतारापर्यंत प्रेम व्यक्त झालेले सांपडणार नाहीं. फक्त हाणामारी त्यांत असावयाची. परशुराम अवतारामध्यें तर हत्त्येची पराकाष्ठा झाली. प्रत्यक्ष आईला ठार करतांना या अवताराला कांहीं वाटलें नाहीं. आणि एकवीस वेळां सर्व पृथ्वीवरील क्षत्रीयांचे गर्भसुद्धां हत्त्या करताना हृदय थोडेसुद्धां चंचल झालें नाहीं. पण एवढें होऊनहि जगाचें दुःख संपलें नाहीं; देवाचेंहि दुःख संपलें नाहीं.

मत्स्यावतारापासून जेवढें अवतार झालें तेवढें जीवांच्या सुखा आड, कर्मा आड, येणाऱ्या राक्षसांना मारण्यासाठीं. प्रत्येक अवतारांत राक्षस मारावेत पण पुन्हा तेच पुढत्या अवतारांत राक्षस व्हावेत असें घडलें, म्हणजे राक्षसवृत्ति नाहींसी होण्याला त्यांच्या ज्ञानांतच सुधारणा होणे योग्य आहे. आणि जी सुधारणा, बोधानें, प्रेमानेंच केवळ होऊं शकते. यासाठीं देवामध्यें प्रेमाचें रूप जेव्हां प्रगट होऊन अगर संताकडून जेव्हां प्रेमाचा बोध भेटून राक्षसांचे ज्ञान सुधारेल तेव्हांच राक्षसी वृत्ति हळु हळु कमी होऊं शकेल. प्रल्हाद, बिभीषण यांच्यांत याच रीतीनें बदल झाला.

## राम जन्मोत्सव कां सुरू केला ?

प्रेमाचा झरा-जिव्हाळा या श्रीराम अवतारापासून आहे आणि म्हणूनच माझ्या मते बाबानी ज्या अवतारांव प्रेम वृद्धिंगत होऊन जीवींचा जिव्हाळा प्रगट होतो, तो रामावतार-रामजन्म-शिरडींत सुरू केला असला पाहिजे.

समर्थ रामदास स्वामीनीं श्री रामायणाचें सार खालील ओव्यात दिलें आहे.

अजिंक्य रजनीचर माजले । देव कारागृहीं घातले ।
म्हणोनि वैकुंठीहून पातले । देव सोडावया ।
जिहीं त्रैलोक्य जिंकिलें । त्यास मर्कटा हातीं मारविलें ।
भुवनत्रय आनंदविले । दाशरथीनें ॥

राम नामाचा महिमा व त्या तारक नामाचें महत्व या युगांत पटविण्याकरितांच बाबांनी 'राम जन्मोत्सव' सुरूं केला.

**राम भालु-कपि-कटक बटोरा। सेतु हेतु सम कीन्ह न थोरा॥**
**नाम लेत भवसिंधु सुखाहिं। करहु बिचार सुजन मनमाहिं॥**

रामाने ऋक्ष कपिसेना मिळवून सेतुबंधासाठीं थोडकीं उलथापालथ केली नव्हती, परंतु नामाच्या तर उच्चारासरशी सबंध भवसागर कोरडा ठणठणीत होतो-भवसिंधूच नसून प्रेमसागर आहे. असा अनुभव नाम देतें. याचा विचार सज्जनांनी आपल्या मनाशींच करावा, हाच एक हेतू त्या उत्सवापोटीं बाबांचा आहे.

श्रीशंकर, शुक, सनकादिक, नारद, ध्रुव, हनुमान, अजामीळ, पिंगला इत्यादि प्राचीन व अर्वाचीन सकल संवनामानेंच प्रेमरूप बनले आहेत. हे बाबांना पूर्ण माहित असल्यामुळें, श्री रामजन्मोत्सव बाबांनीं शिरडींत सुरूं केला.

## ही भगवंताची इच्छा

जें कांहीं घडतें किंवा घडत आहे तें भगवंताच्या इच्छेनुरूप घडत असतें. तेथें आपली मात्रा चालत नाही. किंवा आपण त्यांत फिरवाफिरव करूं शकत नाहीं. हें रहस्य आपण नेहमीं मनांत बाळगलें पाहिजे. आणि तें मनांत बाळगून कोणत्याही परिस्थितींत दुःख किंवा आनंद न मानतां आपण समतोल सांभाळला पाहिजे. त्याच्यावर सर्व भरिभार टाकून आपल्या प्रसन्नतेला आपण धक्का लागूं देतां कामा नये. जें घडणार तें घडूं द्यावयाचें व आपण आपल्या कर्तव्यांत कसूर होऊं द्यावयाची नाहीं, कोणाचेंही अहीत करायचे नाहीं, ही दृष्टि आपण बाळगली पाहिजे.

# साक्षात्कार

लेखक : **केशव कृष्ण प्रधान**

( पहिलें प्रकरण पुढें चालू )

**साक्षात्कार हा विषय मानवी जीवनांत अत्यंत महत्त्वाचा तसाच वाटेल त्याच्या वाट्यास न येणारा विषय आहे. आमचे मित्र व त्या क्षेत्रांत अधिकारी बाण्यानें वावरणारे श्री. केशवराव प्रधान, ॲडव्होकेट, यांनीं हा विषय आमच्या वाचकांस सुलभतेनें समजावा या हेतूनें आपली सिद्धहस्त लेखणी उचलली आहे. गेल्या फेब्रुवारी अंकापासून, ही लेखमाला सुरू आहे. वाचकांनीं त्या लेखमालेकडे कृपया जरूर लक्ष पुरवावें, अशी विनंती आहे.**

—संपादक

यावर पद्मनाथ थोडावेळ गप्प राहिला व नंतर म्हणाला, "तूं म्हणतोस तें खरें आहे माधव. या जगांत ही तंद्री लावायला कुणासही फुरसत नाही. विशेषतः तुमच्या या मुंबई शहरांत तर अजिबात नाहीं. येथें सकाळपासून संध्याकाळपर्यंत जो तो कसा धांवत पळत सुटलेला दिसतो. सर्वच कसेंतरी एकदां उरकलें कीं पडला दिवस पार! अशा तऱ्हेचीच सगळ्यांची वागणूक आहे; परंतु अशानें महत्त्वाचीं कामें पार पडत नाहींत. इतर सटर फटर कामाचें तर विचारूंच नकोस. खरें म्हणजे सर्वच कामें लांबणीवर पडतात. 'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी स्थिति होते. माझ्या मतें विशेष महत्त्वाचीं कामें नीट पार पाडण्यास त्यांत खोल लक्ष घालावें लागतें. तें लक्ष सुद्धां वाटेल तेथें नीट लावावयास त्याला प्रथम इतर आवडीच्या कार्यांत तंद्री, तल्लीनता, खोल निमग्नता, ही लावून ती संवयच अंगीं बाणून घ्यावी लागते. तंद्रीचें, तल्लीनतेचें अगदीं, व्यवहारांत सुद्धा एवढें महत्त्व आहे.

## तंद्रीचें परमार्थातील महत्त्व

परमार्थांतलें त्याचें महत्त्व तर कांहीं विचारूंच नकोस. मानवाला मानवांतला मीपणा हरघडी विसरून जावा व शेवटीं स्वतःमधला व निसर्गामागला समभावी 'मी' चा साक्षात्कार त्याला व्हावा म्हणूनच परमेश्वरानें मी तुला वर्णन केलेल्या तंद्रीची, तल्लीनतेची वर सांगितल्याप्रमाणे अगदीं नित्याच्या व्यवहारांत सुद्धां योजना केलेली आहे.

खरें म्हणायचें म्हणजे या तंद्रीची संवय अगदीं बालपणापासून पोसवून वाढविली पाहिजे, जतन करून वाढविली पाहिजे. तिला मूर्खपणा, भंगटपणा म्हणणाऱ्या लोकांस धड व्यवहारहि कळत नाही व परमार्थहि कळत नाहीं, अशा दुहेरी अज्ञान स्थितींत ते असतात. ही तंद्री जतन करून ती वाढीस लावावी म्हणून आपल्याला आपलीं मोठीं माणसें लहानपणीं किती मजेदार गोष्टी सांगत असत. किंबहुना बालवाङ्मयाची निर्मिती केवळ तंद्री या तल्लीनतेचे व त्यांतून निर्माण होणाऱ्या कल्पकतेचें पोषण होण्यासाठींच आहे. या तंद्री तल्लीनतेंत परमेश्वराच्या महान साक्षात्काराचीं बीजें सर्वत्र इतस्ततः विखुरलेलीं आहेत.

## एका कोळ्याची रम्य गोष्ट

मला आठवतें, आमची आई आम्हाला लहानपणीं एक सुंदर गोष्ट सांगत असे. त्या बिचारीला त्यावेळीं काय माहीत कीं या गोष्टींतून ती माझ्या मनावर त्या दिव्य परमेश्वरी साक्षात्काराचा अतिशय खोल असा परिणाम माझ्या अगदीं शैशवांत मजवर करीत आहे. खरोखरच ती गोष्ट फारच रम्य आहे.

एका नदीकांठी एक कोळी रहात असे. तो फार सात्विक माणूस होता. तो मोठ्या पहांटेस उठून मासे पकडण्याचें साहित्य म्हणजे गळ व जाळें घेऊन नदीच्या कांठाकांठानें मासे पकडण्यास जात असे. कांहीं ठिकाणीं नदीचें पात्र खूप खालीं गेल्यामुळें व कांहीं ठिकाणीं नदीला वळणें असल्यामुळें नदी मध्येंच गुप्त झाली आहे असें वाटे. मधून मधून कोठें खोल डोह तर कोठें खडकामध्यें पाण्याचीं डबकींही झालेलीं असत. एकदां तो कोळी एका सुंदर डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या खोल डोहांत मासे पकडण्यास गेला व डाव्या बाजूला डोंगराकडे तोंड न करतां पूर्वेकडे जेथें नदीचें पात्र दूरवर पसरलेलें होतें तिकडे

तोंड करून गळ टाकून बसला. इतक्यांत गळाला जड जड असें कांहीं लागलें म्हणून तो गळ वर काढूं लागला. त्यानें गळ वर काढायला व पूर्वेकडून सूर्य उगवून वर येण्याला एकच गांठ पडली. गळाला शुभ्र पांढरा मासा लागला होता. परंतु त्याचें अंग इतकें चकचकीत होतें कीं, सूर्याचे उगवतीचे सहस्रसोनेरी किरण त्यावर पडतांच तो मासा जणूं सोन्याचा झाला. हें दृश्य पहाताच कोळ्याचे नेत्र दिपले व त्याच्या हृदयावकाशांत सोनेंच सोनें पसरून गेलें. तो बेशुद्ध पडला व त्याला देव दिसला. तेव्हांपासून त्यानें मासे मारायचा धंदाच सोडून दिला.

बालपणीं मी ही गोष्ट अगदीं मन लावून ऐकत असें व मला वाटायचें, असाच एक दिवस सोनेरी रंग माझ्या हृदयांत शिरावा व मला देव दिसावा.

## पांढरा शुभ्र ससा

मला आठवतें कीं एकदां गांवीं माझ्या मोठ्या भावानें एक पांढरा शुभ्र ससा आमच्या घरीं आणला. त्याच्या एका मित्राकडून त्यानें तो मागून आणला होता. त्या सशाच्या पांढऱ्या शुभ्र केसांमधून, लांब नाकावरील उभ्या कानाखालून दोन सुंदर संध्याप्रकाशी डोळे चमकत होते. आपल्या चिमुकल्या दातांनीं पुढल्या दोन पायांत कोबीचे कंद धरून ते तो तोडीत होता. त्याच्या डोळ्यांतील ती मदिरा माझ्या अंतर्यामीं घुसली व मी बेहोष झालों.

कधींकधीं मला वाटतें माधव कीं, हें सर्व बालपणीं आपल्या मनावर भोंवतालच्या वातावरणांतून होणाऱ्या संस्कारावर अवलंबून असतें. तसें पाहिलें तर तुझ्यासारखेंच आमचें पण घराणें बाळबोध वळणाचें होतें. माझ्या लहानपणीं माझे आई, वडील, आत्या वगैरे वडीलधारी माणसें मोठ्या पहाटेस उठून त्या पवित्र वातावरणांत तुकारामाचे अभंग, भूपाळ्या व पोथी, पुराणें मोठ्या भक्तिभावानें म्हणत व वाचीत. अजूनही मला आठवतें कीं, तेवढ्या पहांटेस स्नान करून आमची आत्या रोज ओलेल्यानें—

**गंगेचे पाणी लोटा भरुनी । सत्वरी आणा घाटावरुनी ।**
**प्रभूसीही हो घाला प्रेमेंकरूनी । प्रभू प्रसन्न प्रसन्न झाला ।**
**दत्त अवदुंबरीं बैसला । कांसे पीताम्बर कासला ।**

ही दत्तप्रभूवरील गीतांजली सुस्वरांत म्हणून त्यांची मोठ्या भक्तिभावानें पूजा करीत असे. आत्याबरोबर मी शेजारच्या दत्तमंदिरांत चातुर्मासांत कीर्तनाला जात असें. पूर्वरंग संपून कीर्तनाचा उत्तररंग सुरू होण्यापूर्वी पेटीवरील कीर्तनकाराचा सहकारी मधूनमधून गोड ललकाऱ्या मारीत नाटकांच्या पदांच्या चालीबर बसविलेलीं भजनें म्हणत असे व हरदासांच्या आवेशयुक्त कंबर कसलेल्या हालचालीला साथ देई. त्यांतच जेव्हां का हरदासांच्या गळयांत घातलेल्या हाराचा व कपाळाला लावलेल्या बुक्क्याचा सुगंध आसमंतात पसरे तेव्हां तर माझी अगदीं ब्रह्मानंदीं टाळी लागे व हरदास हातांतल्या चिपळयांच्या टाळ्यांनीं गाण्याची सम कशी पकडूं शकतात हेंच मला कळेनासें होई. मग हरदास जेव्हां पुराणांतले एखादें आख्यान लावी तेव्हां त्या आख्यानांतील प्रसंग निसर्गाच्या पार्श्वभूमीसहित माझ्या भराऱ्या मारणाऱ्या कल्पनाशक्तीबरोबर खेळूं लागत व मी कधीं मनानें प्रत्यक्ष श्रीकृष्ण तर कधी अर्जुन बनून त्या वर्णनाबरहुकूम आंतल्या आंत मनानेंच क्रिया करून त्या प्रसंगांत रंगच रंग भरून देत असे.

## बालपणींचा अनुभव

पवित्र दत्तमंदिरांत काय, नाट्यगृहांत काय किंवा आपल्या अत्यंत आवडीच्या कादंबरी वाचनांत काय, जी आपणास कल्पनामय अशी गोड तंद्री लागते त्या तंद्रीतद्रींत कांहीं विशेष फरक आहे, असें मला तरी वाटत नाहीं. तन्मयता ही, देहभान काल स्थल विसरण्याची मानवांतील दिव्य अवस्था इथून-तिथून सारखीच असते. ही अवस्था मानवांत निर्माण करून त्याला त्याच्या हृदयकमलांत नेऊन स्वतःचा साक्षात्कार करून आपल्यासारखें देवरूप करण्याचें परमेश्वराचें हें सुखस्वप्न त्वरित साकार करण्याची धडपड किती अजब आहे! परंतु दत्तमंदिरांत लागलेली तंद्री ही मात्र ब्रह्मानंदाची तंद्री व इतर वेळेला लागलेली तंद्री ही वेगळीच, जगांतील व्यवहारांतली तंद्री असें समजणें किती चुकीचें आहे ? अरे, या तंद्रीमुळेंच आपल्या भावना जसजसे आपण मोठे होतों तसतशा वाढीस लागतात. मला आठवतें कीं, ह्या माझ्या तंद्रीच्या, तल्लीनतेच्या नादानेंच पुढें पुढें मला माझ्या भावंडांविषयीं, मित्रमंडळीविषयीं किंवा आई-वडिलांबद्दल मनांत इतके प्रेम निर्माण व्हायचे कीं हा ब्रह्मानंदी साक्षात्कारी रस

आपोआप माझ्या हृदयांतून माझ्या शरिराच्या नसानसांतून वाहूं लागायचा. हाच अनुभव मला माझ्या शाळेच्या शेवटच्या वर्षांत व कॉलेजमध्ये आपल्या पूज्य गुरुजनांविषयीं व आवडत्या प्राचार्यांबद्दल विचार करतांना किंवा त्यांच्या भेटींत येऊं लागला.

एवढेंच कशाला ? आपण कॉलेजमध्ये होतों ना, तेव्हांसुद्धा हा अनुभव मला एकदां आला. ही आठवण फार रम्य आहे. माझा जीवश्चकंठश्च मित्र आहेस तूं. तरी देखील तुझ्यापासून जी गोष्ट मी लज्जेनें लपवून ठेवली होती ती तुला आज सांगतों. तुला आठवतें ? आपल्या कॉलेजशेजारीं कालव्यावर बांधलेला एक लहानसा पूल culvert आहे. तेथें आपल्या कॉलेजांतील व पुणें शहरांतील अनेक युवक-युवतींचे प्रेमविवाह जमविण्याचे भाग्य त्या पुलाला लाभलें आहे. म्हणून आपण त्याला Harmonium Bridge असें म्हणत असूं. एक दिवस संध्याकाळीं कॉलेज सुटल्यावर मी त्या पुलावर विमनस्क अशा स्थितींत एकटाच बसलों होतों. तेव्हां मी कांहींतरी विचारतंद्रींत असावा. परंतु मला कांहींच कळलें नाहीं. त्या कॉलेजवळच्या पायवाटेनें एक सुंदर तरुणी झपाझप पावलें टाकीत माझ्याच दिशेनें येत आहे हें मला ती अगदीं माझ्याजवळ येईपर्यंत कळलें नाहीं. ती अगदीं माझ्याजवळ आली व मी दचकूनच वर पाहिलें. तिचे कमलनेत्र माझ्या नेत्रांशीं क्षणभर मिळाले व माझ्या चेहऱ्यावरून खालीं स्थिरावलेही. कुठेंतरी माझ्या हृदयांत कांहींतरी झालें. ती सुंदरी निघून गेली. आजतागायत मला तिचें नांव व ठिकाण माहीत नाहीं. मी मात्र माझ्या जागीं खिळून राहिलों. सर्व शरिरांत शृंगाररसाचा लपविलेला कारंजा एकदम फुटून उंचउंच उडून वाहूं लागला. तो अमृतरस मेंदूपर्यंत जाऊन भिडला; परंतु मला मात्र कळलें कीं, थोड्याफार फरकानें तोच बालपणीचा पहिला पवित्र साक्षात्कार मला पुन्हा एकदां यौवनांत सुद्धां झाला आहे.

## बालगंधर्वांचें सौभद्र

तुला आठवतें ? आपण कॉलेजांत होतों तेव्हां गंधर्व नाटक मंडळी पुण्याला किर्लोस्कर थिएटरांत एकामागून एक असे सौभद्र नाटकाचे प्रयोग लावीत होती. सुभद्रेचे काम महाराष्ट्राचे लाडके नट बालगंधर्व करीत. अर्जुन

मात्र अधूनमधून बदलत असे. तुझ्यापेक्षां मला नाटकाचा शोक फार. त्यावेळच्या किर्लोस्कर थिएटरांत सौभद्र पहाणें म्हणजे मला वाटतें कीं, पृथ्वीतलावरून उंचउंच आकाशांत अप्सरा, गंधर्व, किन्नर, यक्ष यांच्या समवेत स्वर्गांत पदार्पण करणें. नाटक सुरू होण्यापूर्वी पुढील सर्व रांगा अत्तरांच्या व फुलांच्या सुगंधानें दरवळून जात. प्रत्येक खुर्चीवर मागें रेललेल्या कामिनी ऑइलनें काळ्याभोर झालेल्या सुबक आंबाड्यावरून कोठें अबोलीची तर कोठें जाईजुईची तर कोठें मोगऱ्यांच्या फुलांची अशी रंगसंगती फेर धरी. त्यांतूनच बांगड्यांचा व कंकणांचा किणकिण असा मधुर ध्वनि नाजुक कोमल, स्वरांतून चाललेल्या हास्यविनोदाला साथ देई. डौलदार, सुबक, शुभ्र व मोहक हंसकंठांच्या खुर्चीवरून वरखालीं होणाऱ्या हालचाली पहात असतांनाच खेळ सुरू होण्याची घंटा होऊन रंगदेवतेला लावलेल्या उदधूपाचा वास हवेत दरवळे. पडदा वर जाई व 'नमन नटवरा विस्मयकारा' किंवा 'तुम्हां तो शंकर सुखकर होवो' अशा अर्थाचे ईशस्तवन सुरू होई.

इहलोकाला तंद्रीचे महत्त्व समजावून देण्यासाठीं परमेश्वरानें खास निर्माण केलेली ती देवदूताची मूर्ति प्रत्यक्षांत बालगंधर्वांच्या मोहक स्वरूपांत रंगभूमीवर पहाण्याचें भाग्य ज्या नेत्रांना लाभलें, त्यांचे दिव्य स्वर्गीय संगीत ऐकून हे कर्ण तृप्त झाले, त्याला साक्षात्कारी तंद्री ही कांहीं निराळी तंद्री असते का, असे विचारण्याची जरूरीच नाहीं. सौभद्र नाटकांत निसर्गाच्या सौंदर्यांतून मानवी हृदयांत होणाऱ्या भावनात्मक चढउतारावरून, दुष्ट कपटी खलांच्या प्रवृत्तींतून भगवान श्रीकृष्णाच्या युक्त्यायुक्त्यांतून, मानवी जीवनाचा आपणास पूर्ण साक्षात्कार होतो. हें नाटक पहात असतांना लागणारी तंद्री व ब्रह्मानंद प्राप्त करून देणारी तंद्री यांमध्ये जर जमीनअस्मानाएवढा फरक असेल तर मग नाट्य, काव्य, विनोद, शास्त्र वगैरे सर्व फक्त मानवाचे मनोरंजन करण्यापुरतेच उपयुक्त आहेत असें म्हणावे लागेल. बहुजनसमाजाचा हाच समज आहे व आमचे धर्मगुरुसुद्धां आम्हांस हेंच सांगतात. म्हणून स्वतःला सोवळीं व धार्मिक समजणारीं माणसें नाटक-सिनेमा पहात नाहींत. त्यांना असें वाटतें कीं, ब्रह्मानंद, साक्षात्कार वगैरे जें कांहीं आहे तें फक्त धार्मिक ग्रंथातच भरलेलें आहे. किती खोटी कल्पना आहे ही! जीवन नीट समजावून घ्यायचे कीं विषयसुखाकडे

द्रोपदीं ओढले जाऊं, या भीतीनें त्यापासून दूर पळायचें ? जीवनाशीं अगदीं संबंध न धरणारा हा यांचा सर्वव्यापी परमेश्वर कसा ?

## परमेश्वर अभंगांतच आहे का ?

सौभद्रांतील 'पुष्पपराग सुगंधित शीतल' हें पद बालगंधर्व म्हणत होते. मी त्यांच्या मधुर, स्वर्गीयआलापांनीं व स्वरांनीं गुंग होऊन तें पद ऐकत होतों. ऐकतां ऐकतां मी किर्लोस्कर थिएटरांत बसलों आहें हें मी विसरून गेलों. बालगंधर्वांच्या बरोबर पार्श्वभागी आलापा अरण्याच्या देखाव्यात म्हणजे पडद्यांत शिरून मी त्या रानांत कल्पनेनें स्वैरसंचार करूं लागलों. त्या रानांतील पुष्पपरागांचा सुगंध मला धुंद करूं लागला व 'शीतल अति मंद चरे वनवायु हा' या ओळीबरोबर खरोखरीच मंद वायु मला सुखवीत आहे कीं काय असें वाटूं लागलें. आता अरण्यांतील झुळझुळ वाहणाऱ्या ओढ्याच्या कांठाकांठानें परागसुगंध अनुभवीत वृक्षवल्लीं-मधून अरण्यांतील गवतें, झुडपें, वेली, झरे, पक्षी यांबरोबर एकरूप होऊन फिरत असतांना मला जी तंद्री लागली ती तंद्री व 'वनचरें आम्हां जातीचे सोयरे, पक्षीही सुस्वरें आळविती.' या श्री तुकाराम महाराजांच्या स्वरांतून निर्माण होणारी माझी तंद्री यांत कांहीं फरक आहे काय ? परमेश्वर अभंगांतच आहे का ? नाटकाच्या पदांत नाहीं का ?

## तंद्री सर्वत्र फळास येते

थोडक्यांत म्हणजे आपली मनबुद्धि एकाग्र झाल्याशिवाय आपण तल्लीन होऊंच शकत नाहीं. आणि मनबुद्धि हीं फक्त आपल्या आवडीच्याच विषयांत आपोआप एकाग्र होऊन तल्लीन होतात. ही तल्लीनता फक्त धार्मिक ग्रंथांतच नाहीं किंबहुना थोड्याफार जास्त प्रमाणांत ती आपणास इतर वाङ्मयांतून व जीवनाच्या प्रसंगांतूनच अनुभवितां येते. अगदीं व्यवहारांतसुद्धां आपली तंद्री लागते. हा सर्वांचाच अनुभव आहे. आपल्या भोवतालची सर्व माणसें पैशांच्या जगांत फारच गुंगून गेलीं आहेत, असें तूंच आतां म्हणालास. तें कांहीं वाईट नाहीं. अगदी व्यवहारी आण्या–पै वाल्या माणसानीं आण्या–पै च्या व्यवहारांत सुद्धां इतके गुंगून जावें कीं तेथें सुद्धां त्याला या प्रकारची तंद्री लागेल. महिन्याचा पगार हातांत पडल्यावर त्यांत महिन्याला लागणाऱ्या सर्व गरजा बसवावयाच्या असतात.

त्यांचा अगोदर विचार करतांना इतकें वाण्याचे—असें म्हणतांच आपला नेहमींचा वाणी धोतरटोपी घातलेला—लगबगीनें आपल्या घराकडे येत आहे हें आपल्या मनश्चक्षूंसमोर दिसलें पाहिजे. तसेंच दूधवाल्याचे, तसेंच भाडे असूल करावयास येणाऱ्या घरमालकाचे. या सर्वांची मनोमन दर्शनें आधींच आम्हांस घडलीं पाहिजेत. हें सर्व घडावयास एक तंद्री–तल्लीनता लागावीच लागतें. तन्मयतेंत गंमत आहे. त्यांत उगीचच शरीरांतील, मनांतील गोड भाव जागृत होतात. बिल वसूल करण्यास येणाऱ्या व्यक्तीचा आपणास त्रास होणार असल्यास त्यांतून सुटका म्हणून आयतें उत्तर, आपला हजरजबाबीपणा हा सुद्धां या तंद्रींतून निर्माण होतो. अगदीं खोटें बोलण्यासाठीं, खोटे नाव तयार करण्यासाठी सुद्धां व्यवहारांत लोक या तंद्रीचा उपयोग करतात. त्या तिच्या मर्यादा आपण सुसंस्कृत मनाने ओळखल्या म्हणजे झालें. स्वतःला धार्मिक समजणारी माणसे बहुतेक मोठ्या पहाटेस उठतात. त्या मंगल आणि शुभवेळी भूपाळ्या, अभंग, पोथीपुराणे म्हणत किंवा वाचत असताना नकळत त्याचें सन व्यवहारांतील बाबीकडे ओढत असतेच. अशावेळी गुलाबी थंडी पडली आहे, चहा बनविणारा स्टोव्ह फुर्रर् आवाज करून एक अद्वितीय संगीत म्हणत आहे व त्यांतच कपबशांचा नाद–मधुर आवाज, सौभाग्यवतीच्या हातांतील कंकणांच्या आवाजात मिसळलेला आहे. हे सर्व ऐकताना जी गोड हृदयाला सुखविणारी तंद्री लागते ती ओढून-ताणून म्हटलेल्या प्रभुनामापेक्षा मधुर नसते का? भगवंतांनी गीतेंत अर्जुनाला 'योगस्थ कुरु कर्माणि' ही शिकवणूक देताना अगदी व्यवहारिक कर्म करीत असतांनासुद्धा त्यात निर्माण होणाऱ्या विविध हालचालींशी एकरूप होण्यास सांगितलें आहे. कारण त्यामुळें काम, मग तें कोणतेंहि असो, त्यांतील गोडीशी आपण एकरूप होतोंच. आपोआप ध्यानस्थ अवस्था साधते आणि कामहि बिघडत नाहीं. यशापयशाची म्हणजे फळाची कल्पनाही त्या स्थितींत येत नाहीं. व अनायासेंच 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या वचनाचें जसें व्हावें तसें पालन होतें.

# अवधूतत्वाचीं लक्षणें

लेखक :—गणेश नीलकंठ पुरंदरे, ॲडव्होकेट

परमपूज्य साईबाबा अवधूत होते. त्यांचा जीवनक्रम अवधूतत्वाचा होता, हें त्यांच्या जीवनांतील निरनिराळ्या प्रसंगांवरून स्पष्ट दिसून येतें. 'अवधूत' ही अत्युच्च कोटीची अवस्था आहे. ही वर्णाश्रम-धर्मापलीकडील अशी 'अत्याश्रमी' अवस्था आहे. अवधूत म्हणजे त्रिकाळज्ञानी. मर्यादित देहामध्ये, अमर्याद शक्तीचा पूर्णप्रकाशी ज्ञानी पुरुष.

'अवधूत-उपनिषद्'मध्यें अवधूत शब्दाची व्याख्या दिलेली आहे.

**अक्षरत्वाद् वरेण्यत्वाद् धूत-संसारबन्धनात् ।**
**तत्त्वमस्यादिलक्ष्यत्वाद् अवधूत इतीर्यते ॥**

"अ" शब्दाचा अर्थ आहे 'अक्षरत्व'. म्हणजे ज्यांना अक्षरब्रह्माचा साक्षात्कार झालेला आहे असे भाग्यशाली सत्पुरुष "व" शब्दाचा अर्थ 'वरेण्यत्व'. म्हणजे पूर्णत्वाची पराकाष्ठा ही अत्युन्नत स्थिति प्राप्त झाल्यावर साधक पूज्य महापुरुष बनतो.

"धू" शब्दाचा अर्थ 'धूतसंसारबन्धन' म्हणजे ज्यांची सर्व प्रकारची सांसारिक बंधनें आपोआप तुटून पडलेलीं आहेत असे महापुरुषः "त" शब्दाचा अर्थ 'तत्त्वमसि' हे महावाक्य, म्हणजे स्वस्वरूपानुसंधानामध्ये अखंड भावाने वर्तणारे महापुरुष.

**आशापाशविनिर्मुक्त आदिमध्यान्तनिर्मलः ।**
**आनन्दे वर्तते नित्यमकारस्तस्य लक्षणम् ॥**

अवधूत गीता अ. ८. श्लो. ६

जो संसारामधील विषयरूपी बंधनांपासून मुक्त असतो; म्हणजे संसारामधील भोगविषयांमध्यें ज्याची कांहींही इच्छा राहिलेली नसते; आणि

ज्यांचें मन जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमध्ये विषयांकडे धांवत नाहीं: जे नेहमीं, तिन्ही त्रिकाळीं, भूत, वर्तमान व भविष्य काळांत पवित्रच असते तसेच जे कौमार्य, यौवन व वार्धक्य या तीन्ही अवस्थांमध्यें सर्वदा पूर्णपणें निर्विकार राहाते आणि जें सदैव ब्रह्मचिंतनामध्येंच तल्लीन राहते ते 'अ' ह्या वर्णाचें लक्षण समजावें.

**वासना वर्जिता येन वक्तव्यं च निरामयम् ।**
**वर्तमानेषु वर्तेत वकारं तस्य लक्ष्मणम् ॥ ७ ॥**

ज्याने वासनांचा त्याग केलेला आहे; इतका कीं, केवळ भूलोकांतील भोगच नव्हेत तर ब्रह्मलोकापर्यंतचे सर्व प्रकारचे भोग त्याने विषवत त्याज्य ठरविलेले आहेत. तो 'व' चा अर्थ. वासना दोन प्रकारच्या असतात; एक शुभवासना व दुसरी अशुभवासना. शुभवासनांचा हेतू अंतःकरण शुद्धि हा होय, अशुभवासना बंधनमूलक असतात. ह्या दोन्ही प्रकारच्या वासनांचा अवधूताने त्याग केलेला असतो. शुभ वासनांत त्याग अशा करता केलेला असतो कीं त्याला आता चित्तशुद्धीची सुद्धां जरूरी राहिलेली नसते; कारण कीं त्याला सिद्धावस्थाच प्राप्त झालेली असते; त्याची वाणी सर्वदा मधुर असते; त्याच्या बोलण्याने कोणाच्याही मनाला क्लेश होत नाहींत; तो सदैव चालू काळातच वर्तत असतो; त्यातच संतोष मानून राहतो व आपला योगक्षेम चालवीत असतो; सर्वदा ब्रह्मानंदाचा अनुभव घेत असतो; भविष्य काळाची कधींही चिंता करीत नाहीं, गेल्या झाल्या गोष्टीचा खेद मानीत नाहीं.

**धूलिधूसरगात्राणि धूतचित्तो निरामयः ।**
**धारणाध्याननिर्मुक्तो धूकारस्तस्य लक्षणम् ॥ ८ ॥**

ज्यांचीं गात्रें धुळीनें धुळकट, मळकट झालेलीं असतात; ज्याचें चित्त पूर्णतया किल्मिषरहित झालेलें असतें; निर्मळ झालेलें असतें, जो निरोगी असतो; जो अष्टांगयोगांतील धारणा व ध्यान यांपासून मुक्त झालेला असतो, असा अवधूत शब्दातील 'धू' कार अक्षराचा अर्थ.

**तत्त्वचिंता धृता येन चिंता चेष्टाविवर्जितः ।**
**तमोहंकारनिर्मुक्तस्तकारस्तस्य लक्षणम् ॥ ९ ॥**

ज्याने फक्त परमार्थतत्त्वाचीच चिंता धारण केलेली आहे; ज्याने कोणत्याही प्रकारची चिंता व हालचाल, खटपट करण्याचें सोडून दिलेलें आहे; जो अज्ञान व अहंकार यापासून पूर्णपणे मुक्त झालेला आहे; तें 'अवधूत' शब्दातील 'त' काराचें लक्षण समजावें.

अवधूत म्हणजे अत्याश्रमी; सर्व आश्रमधर्मांपलीकडील समजले जातात. ते स्वतःच ब्रह्मपुरुष, आत्मक्रीड, आत्मराम विधि-निषेधातीत असतात. सर्व प्रकारचे भेद, अभेद, भेदाभेद या सर्वांपलीकडे ते गेलेले असतात असे त्रिपुरारहस्य या ग्रंथाच्या ज्ञानखंडामध्यें सांगितलेलें आहे.

अवधूत पदवीला पोचलेल्या सिद्धांना कांहीं धर्मग्रंथांतून खास असें ज्ञान मिळवावें लागत नाहीं कीं कांहीं मांत्रिक किंवा तांत्रिक विद्येची साधना करावी लागत नाहीं. ते आत्मानंदामध्ये तल्लीन झालेले असतात. त्यांचें चित्त अतिशुद्ध झालेले असते.

अवधूत योग्यांचें वर्तन, आचरण सामान्य जनांना चमत्कारिक वाटतें. याचें कारण सामान्यजन फक्त भूलोकांतच वावरत असतात. जितके भोगवादी तितके जडदेहासच ते चिकटलेले असतात. अवधूत योगी भूलोकाप्रमाणें त्याच्य वरच्या भुवरलोकासारख्या लोकांतही वावरत असतात. वरच्या लोकांत वावरतांना त्यांना भूलोक, आभासमय, मिथ्या वाटतो. भूलोकांत वावरणाऱ्या लोकांचे असत्य, दंभ, मद, मोह, मत्सर यांवर आधारलेले विचार, विकार त्यांना स्पर्श करूं शकत नाहींत. भूलोकांतील लोकांप्रमाणे वागण्याची त्यांना जरूरी वाटत नाहीं. तसें करणें त्यांना अर्थशून्य वाटतें. त्यामुळे सामान्य जनांना त्यांचे वागणें चमत्कारिक वाटतें.

अवधूतयोगी स्वतःस ब्रह्मचैतन्याहून, परमतत्त्वाहून भिन्न समजत नाहीं. त्यांमुळें त्यांच्यामध्यें द्वैताची, अहंकाराची भावना उरत नाहीं. ते सर्व भूतमात्रांचे ठिकाणें समभावें वर्तत असतात.

**जो सर्वां भूतांचे ठायीं । द्वेषाने जेणेंची कांहीं**
**आपपरू जया नाहीं । चैतन्या जैसे ॥**

ज्ञानेश्वरी अ. १२

अशी त्यांची वृत्ति झालेली असते. समत्वं योग उच्यते । समत्व त्यांचे ठिकाणीं पुरें बाणलेलें असतें. त्यामुळें अन्य प्राणिमात्रांची मने त्यांना आपोआप समजतात. त्यांचीं मनें ते अंकित करूं शकतात. अन्य प्राणिमात्रांचे अहंभाव नष्ट करून त्यांना ते आपल्या सारखे करून टाकतात.

परमात्मस्वरूप हें सत्यस्वरूप आहे. अवधूतयोगी स्वतःस परमात्म तत्त्वाहून भिन्न समजत नसल्याकारणाने त्यांचे ठिकाणी सत्य नेहमीं उदितच असतें. म्हणून त्यांचे मुखांतून सत्यापरते अन्य कांहीं पडतच नाहीं. त्रिकाला-बाधित सत्यच बाहेर पडतें. जे जसे बोलतात त्यालाच वाचासिद्धि म्हणतात.

याशिवाय अवधूत योग्यास परातीत ज्ञान, प्राप्त झालेलें असल्यानें त्यांना अणिमा, अधिमा, प्राप्ति, प्राकाम्य, महिमा, ईचत्व, वशित्व व कामावसायित्व ह्या सिद्धि प्राप्त होतात व अशा सिद्धींच्या साह्याय्यानें ते चमत्कार करून दाखवूं शकतात,


## गुजराथी श्रीसाईसच्चरित्र

"स्वामी साईशरणानंद अनुवादित श्रीसाईसच्चरित्र पोथीची पद्यात्मक ओवी - बद्ध गुजराथी आवृत्ति आतां संस्थानच्या मुंबई आणि शिर्डी कार्यालयांत विक्रिसाठीं तयार आहे. एका प्रतीची किंमत रु. ८ (रु. आठ असून) पोस्टेजला रु. २ (रु. दोन) अधिक पडतात. प्रत्येक गुजराथी साईभक्तानें ही पोथी आपल्या घरी अवश्य ठेवावी."

# उर्मिलेचें बलिदान—

प्रभु सेवेनें लक्ष्मणाला उरलें नच तव भान
उर्मिले धन्य तुझें बलिदान ॥ धृ ॥

धनू भंगतां झडली नौबत
सुरें गायिलें मंद मधुर गित
राम सितेच्या मधु मिलनानें
तुझें घेतलें दान ॥ उर्मिले ॥

परस्परांच्या सहवासांतुन
वनांत सजलें गे नंदनवन
म्हणुन तुझ्या गे विकल मनाचें
कुणास नुरलें भान ॥ उर्मिले ॥

कांचनमृग वा रेषा कसली
स्वप्नीं कधिं नच तुला स्पर्शिली
म्हणुनच कां गे रामकथेनें
नच दिधलें तुज स्थान ॥ उर्मिले ॥

अपूर्ण आहे रामकथा ही
जरि तिजला गे उपमा नाहीं
हवें शेवटीं जोडायाला
तव त्यागाचें पान ॥ उर्मिले ॥

—लक्ष्मणतनय

# शिरडी-वृत्त

फेब्रुवारी १९६९

या महिन्यांत बाहेरगांवच्या भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणेंच होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणेंः—

## कीर्तन

श्री. ह. भ. प. रामचंद्र सदाशिव भट ७७६ सदाशिवपेठ पुणें. सं. गवई यांचीं कीर्तनें नेहमीप्रमाणें झालीं. श्रीरामदासनवमी व महाशिवरात्र या दिवशीं जादा कीर्तनें झालीं.

## गायन

श्री. शांताराम रामकृष्ण नेरूरकर, मुंबई.
सौ. शालिनी नारायणराव कुळकर्णी इंदौर म. प्र.
सौ. विमल मनोहर गुते, माहिम मुंबई १६
कु. इंदुमती नामदेव गोरे, मुंबई ४

## महाशिवरात्र

महाशिवरात्रीनिमित्त श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणुक व कीर्तन असा कार्यक्रम झाला.

## हवापाणी

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | ( Kannad ) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**–by Pradhan | | | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** ( Telgu ) | | | १-०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | ( मराठी ) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | **साईबाबा–अवतार व कार्य** | ( मराठी ) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | **साईबाबांचे ४ अध्याय** | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | **सगुणोपासना** | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | **कीर्तन पंचक** | ( मराठी ) | श्री. देव | १-५० |
| (१५) | **शीलधी** | ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | **श्री साईगीतांजलि** | ( मराठी ) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | **Guide to Shirdi** ( English ) | | | ००-१२ |
| (१८) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | ( मराठी ) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ medium | 00-50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra ( minimum durchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office ' Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14